# माणूस

बुधवार । २४ मार्च ७१ । ४० पैसे



## गरीबी हटणार की गरीबच हटणार ?

...मलपृष्ठ २ पाहा

बुधवार २४ मार्च १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : बहात्तरावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

▫ माणूसचा मुंबई निवडणूक विशेषांक अपेक्षेप्रमाणेच, किंबहुना अपेक्षेपेक्षाही जास्त सरस होता. त्यातल्या त्यात उल्लेखनीय म्हणणे 'झपाटलेला जॉर्ज : एक प्रकट चिंतन.' प्रत्येक सुबुद्ध नागरिकाला विचार करायला लावणारे हे प्रकट चिंतन होते. जॉर्ज फर्नांडिससारख्या तळमळीच्या कार्यकर्त्यालादेखील वरील लेखात लिहिल्याप्रमाणे वैफल्याचे उद्‌गार काढावे लागतात, ही खरोखरीच एक शोकांतिका आहे. परंतु जोपर्यंत भारतातील बहुसंख्य मतदार अशिक्षित व अडाणी आहेत तोपर्यंत अशा अनेक प्रामाणिक, जिद्दीच्या नेत्यांच्या नशिबी असे वैफल्य लिहिलेले राहणार आहे. असो. या वेळेपर्यंत लोकसभेच्या चारशेच्यावरील जागांचे निकाल घोषित झालेले असून, पन्नास टक्क्यांच्यावर जागा मिळून आता दोन तृतीयांशा-कडे, इंदिराजींच्या पक्षाची वाटचाल आहे. भल्याभल्यांना धक्के देणारे निकाल घोषित होत आहेत. जनमत अजीब चीज आहे, खरेच!

मुंबईतील पाचही जागा नव-कॉंग्रेसने पटकाविल्या. जॉर्ज फर्नांडिसचे डिपॉझिट जप्त झाले आहे, शिवसेनेचे मनोहर जोशी, दत्ता प्रधान सपशेल पडले आणि मुकुंदराव आगासकरांना पुन्हा हार खावी लागली. नवल टाटांना मतदारांनी दुरूनच टाऽटा केले. अशी ही निवडणूक फार गाजली. श्री. बाळ ठाकरे मात्र खरोखरीच अनाकलनीय! एवढा खटाटोप करून शेवटी काय मिळाले? कोण कुणाला आडवे गेले? ह्या प्रश्नाचे उत्तर न शोधणेच बरे!

१२ मार्च, १९७१ — भालचंद्र लातुरकर, वडोदा.

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

अरुण गोसावी

# चर्चाही करू नये इतके हास्यास्पद....

गेल्या निवडणुकीतला नव्या काँग्रेसचा विजय चक्रावून टाकणारा होता. महाराष्ट्रातील आणि विशेषतः मुंबईतील. सबंध देशभर ज्या झंझावाती लाटेने राजकारणी भाष्यकारांचे पत्त्यांचे बंगले उधळून टाकले त्याच लाटेने मुंबईलाही तडाखा दिला आणि आतापर्यंत कुठल्याही पक्षाला साधला नाही असा दिव्य विक्रम नव-काँग्रेसने केला. मुंबईच्या पाचही लोकसभेच्या जागा एका पक्षाच्या ताब्यात कधीच नव्हत्या. ज्या मुंबईत या पक्षाला दोन-तीन महिन्यांपूर्वी फारसे स्थान नव्हते, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मिळत नव्हते, तिथेच नव-काँग्रेसचा हा प्रताप! लोकमहिमा आणि इंदिरामहिमा.

विरोधी पक्षांनी बरोबर एकी साधली नाही. उदाहरणार्थ शिवसेना, आणि जनसंघ यांनी एकत्र निवडणूक लढविली असती तर काँग्रेसचा पराभव होऊ शकला असता वगैरे मुद्दे काहीजण उपस्थित करतात. पण ते सर्व गैरलागू आहेत. दक्षिण मुंबईतील एक कैलास सोडले तर मुंबईतील इतर चारही विजेत्या उमेदवारांचे मताधिक्य एवढे प्रचंड आहे की जनसंघ आणि शिवसेना यांची मते एकत्र करूनही ते भरून काढता आले नसते. लोकांनी ठरवून झुंडी-झुंडींनी नव-काँग्रेसला मतदान केले हेच खरे. खुद्द नव-काँग्रेसलादेखील आपला हा प्रचंड विजय अनपेक्षित होता. दहा मार्चला वेगवेगळ्या केंद्रांवर मतमोजणी होऊ लागली तेव्हा विरोधी उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी (विशेषतः शिवसेनेच्या) विजयोत्सवाची जय्यत तयारी करून ठेवली होती. हार-तुरे, पेढे, फटाके वगैरे. मोजणी जसजशी पुढे सरकू लागली तसतसा त्यांचा उत्साह गळाला. हार-तुरे, पेढ्यांचे शेवटी काय झाले माहिती नाही. फटाके मात्र होळीच्या दिवशी मुंबईत बऱ्याच ठिकाणी फुटले.

खुद्द नव-काँग्रेसचे उमेदवारही आपल्या धणाधाती विजयाने भांबावून गेले होते. मतमोजणी संपत असता एका विजेत्या नव-काँग्रेस उमेदवाराने उद्गार काढले, 'ही इंदिरा गांधींची कमाल आहे. लोकांनी इंदिरा गांधींना मते दिली आहेत. मला नव्हेत.'

खरोखर निवडणुकीपूर्वी नव-काँग्रेसची संघटनात्मक स्थिती अतिशय केविलवाणी होती. अगदी काँग्रेसमध्ये फाटाफूट झाल्यापासून नव-काँग्रेसला मुंबईत कार्यकर्ते मिळत नव्हते. श्री. सिलम यांना मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष केले गेले त्यावरून मारामाऱ्या झाल्या. सिलम काही फारशी संघटना बांधू शकले नाही. जुन्या मुंबई काँग्रेसमध्ये ज्यांना स्थान नव्हते अशी मंडळी नव-काँग्रेसकडे येत अशी परिस्थिती होती. निवडणुकीच्या आधी एक महिना मुंबई महानगरपालिकेतील जुन्या काँग्रेसचे काही नगरसेवक पक्ष सोडून नव-काँग्रेसमध्ये गेले. त्यामुळे त्या पक्षात थोडी जान आल्यासारखी वाटली. पण याचा अर्थ संघटनात्मकदृष्ट्या मुंबई नव-काँग्रेस निवडणूक लढविण्यास पुरेशी सिद्ध होती असा नव्हे.

नव-काँग्रेस संघटनेची अशी दुबळी स्थिती, विरोधी पक्षांचा आक्रमक प्रचार, शिवसेनेच्या घोषणा आणि मिरवणुका, टाटांच्या प्रचाराचा बादशाही थाट आणि मुंबईतील जुन्या काँग्रेसचे बळ या सर्व गोष्टींमुळे कोणत्याही निरीक्षकाला या शहरात नव-काँग्रेस उमेदवारांना फारशी संधी नाही असेच वाटले असते. याशिवाय मुंबई महानगरपालिकेत आणि विधानसभेत नव-काँग्रेसचे आमदार अगदीच कमी. परळच्या पोटनिवडणुकीत नव-काँग्रेस आणि कम्युनिस्ट एकत्र येऊनही शिवसेनेचा उमेदवार निवडून आला. पण हे सर्व काही खरे लोकमत कुठे आहे याचे मुळीच निर्देशन नव्हते. मतपेट्या उघडल्या तेव्हाच लोकमताचे वारे कुठल्या दिशेला आणि केवढ्या जोराने वाहते आहे हे कळून चुकले.

पराभूतांची स्थिती मोठी चमत्कारिक होती. विशेषतः, ज्यांना राजकीय परिपक्वता अजून आलेली नाही त्यांची तर फारच. ते चिडतात, आक्रस्ताळेपणा करतात, डोक्यावरचे केस ओढतात आणि आपल्या पराभवाबद्दल दुसऱ्यालाच दोष देतात. अशीच स्थिती शिवसेनेच्या नेते-लोकांची झाली आहे. पराभव झाल्या झाल्या त्यांच्या मेंदूत काय काय दिव्य कल्पना स्फुरल्या ! मतपत्रिका म्हणे रशियाहून छापून आणल्या. त्यात गाय-वासराच्या चिन्हावर म्हणे एका अदृश्य शाईचा छाप मारलेला. हा छाप चार दिवसांनी उमटणार आणि मतदारांनी ढालतलवारीवर अथवा घोड्यावर मारलेला छाप नाहीसा होणार !

हे आरोप गंभीर असले तरी त्यांची चर्चादेखील करू नये एवढे हास्यास्पद आहेत. परंतु एक लाखाच्या सभेत बाळ ठाकरेंनी हे आरोप करावेत. शिवसेनेच्या सभांना जाणारे बहुसंख्य तरुण भाबडे असतात. बाळासाहेब सांगतील ती पूर्वदिशा मानणारे. ठाकरे यांच्यावर श्रद्धा असणारे. ठाकरे जे सांगतील ते खरे मानणारे. बाळासाहेब सांगतात मग ते खोटे कसे असेल ? अशा तरुणांच्या मनात श्री. ठाकरे यांनी लोकशाहीविषयी आणि मतदानपद्धतीविषयी जहर कालविण्याचे पाप केले आहे. खरोखर कुणी पंधरा मिनिटे विचार केला तरी श्री. ठाकरे यांचे आरोप किती हास्यास्पद आहेत हे कुणाच्याही लक्षात येईल. अदृश्य होणारी शाई

जर खरोखर वापरली असेल तर ती कोठून आणली ? मग कोअर्सची शाई आणली होती तिचे काय झाले ! प्रत्येक पोलिंग स्टेशनवर निवडणूक अधिकारी आणि इतर अनेक कर्मचारी होते. त्यांच्या लक्षात काहीच आले नाही ? निदान ज्या पॅड-मधून शिक्क्यांसाठी शाई वापरण्यात येते त्या पॅडवरील नावे वगैरे, की हे सरकारी नोकरही इंदिरा गांधींच्या 'कपट कारस्थाना'त सामील होते ? आणि एवढ्या २५ कोटी मतपत्रिका रशियाहून छापून आणल्या ? कुठल्या विमानातून किंवा जहाजातून ? मग इथल्या छापखान्यांत छापलेल्या पत्रिकांचे काय झाले — असे असंख्य प्रश्न विचारता येतील. आपल्या आरोपांचा संपूर्ण अर्थ काय होतो याचा ठाकरेंनी विचार केला होता की नाही कुणास ठाऊक ! अशा रीतीने २५ कोटी मतदारांना फसवायचे असेल तर निदान अर्धा कोटी लोकांना तरी कारस्थानात शामील करून घेतले पाहिजे. हे सर्व लोक गप्प आहेत काय ?

खरे म्हणजे या आरोपांची चर्चाही करू नये. पण ठाकरे यांच्या सभांना जाणाऱ्या भाबड्या तरुणांसाठी तरी कोणीतरी हे आरोप किती खोटे आहेत हे सांगितले पाहिजे. ठाकरे यांचे शिवाजी पार्कवरील भाषण ऐकून मतपत्रिकांविषयी आणि शाईविषयी वेड्यासारखे बरळणारे आणि मनःशांती ढासळलेले तरुण पाहण्यात आले आहेत म्हणून हे लिहावे लागते. निवडणुकांचा निकाल बघून 'हे काही तरी चेटूक आहे— काही तरी गडबड आहे,' असे काही भाबड्या मूर्ख लोकांनी म्हणणे ठीक आहे. पण ठाकरे यांच्यासारख्या नेत्यांनी ? पराभवामुळे विवेकबुद्धीचा तोल जावा तरी किती ? आपल्या पराभवाची अलिप्तपणे मीमांसा करून त्यामधून धडे शिकण्याऐवजी मतपत्रिकेवर खापर फोडण्याचा पोरकट आकस्ताळेपणा शिवसेनेला फारसा फायद्याचा ठरणार नाही.

बाळ ठाकरेंनी आणि त्यांच्या अनुयायांनी थोडे डोळे उघडून आजूबाजूला पाहिले तरी कळून येईल की शिवसेनेची लोकप्रियता आता झपाट्याने ओसरू लागली आहे. ठाकरे जेव्हा मराठी—महाराष्ट्र, मराठी माणसांसाठी नोकऱ्या, मुंबईत मराठी माणसाला मानाचे स्थान वगैरे घोषणा देत होते तेव्हा मराठी मनात त्यांची लोक-प्रियता अफाट होती हे निःसंशय. त्या भरात लोकांनी शिवसेनेला मुंबई महानगर-पालिकेच्या निवडणुकात भरपूर पाठिंबा दिला. पण ज्या क्षणापासून ठाकरे राज-कारण बोलू लागले तेव्हापासून हा भर ओसरला. नंतर मवालीगिरीही आली. शिवसेनेचा वचक आला. बाळासाहेबांच्या मागे तरुण राहिले. पण लोकांच्या मनात फारसा आदर उरला नाही. ज्या दक्षिण भारतीयांविरुद्ध लढ्यासारखी आपली मोहीम ठाकरेंनी सुरू केली. त्यांना जिंकण्यासाठी नाही ते प्रकार केले. वैजयंतीमालेने बाळासाहेबांना राखी बांधली. शिवसेनेने चित्रपट-शाखा काढली. मोठमोठ्या नटां-बरोबर आणि निर्मात्यांसमवेत हाती पाईप घेतलेल्या बाळासाहेबांचे रुबाबदार फोटो फिल्मी साप्ताहिकांमध्ये छापून येऊ लागले. कारखानदार-उद्योगपतींबरोबरची

त्यांची वर्दळ वाढू लागली. मंत्री लोकांशीही दोस्ती होऊ लागली. परंतु त्या प्रमाणात ठाकरे यांची लोकप्रियता वाढली नाही. उलट कमीच झाली. कॉस्मॉपॉलिटन गटांमध्ये त्यांची मैत्री वाढली आणि निवडणुकीपूर्वीचा काही काळ तर असा होता की मुंबईच्या तमाम दक्षिण भारतीयांमध्ये बाळ ठाकरे फारच लोकप्रिय झाले होते. त्यांच्या कम्युनिस्टविरोधी पवित्र्याचा हा परिणाम. त्यामुळे शिवसेनेचे मध्य मुंबईतील उमेदवार मनोहर जोशी यांना माटुंग्याच्या दक्षिण भारतीयांच्या आणि गुजराथ्यांच्या वस्तीत चांगली मते पडली. या एकाच विभागात जोशींना काँग्रेस उमेदवार भंडारे यांच्यापेक्षा तीनशे मते जास्त पडली. बाकी सर्व विभागात-जिथे मराठी मतेच अधिक आहेत-जोशींनी अक्षरशः हजारो मतांनी मार खाल्ला. हे कशाचे लक्षण आहे ?

दोन मार्च १९७० रोजी ठाकरेंनी मुंबई बंद केली होती. बंद म्हणजे एकदम बंद. तेव्हा शिवसेनेचा वचक होता आणि सरकारचा पाठिंबा होता, म्हणून ते जमू शकले ते शिवसेनेच्या ताकदीचे प्रदर्शन होते काय ? शिवसेनेची ताकद आणि सरकारची ताकद यांचे ते संयुक्त प्रदर्शन होते. जनता अलिप्त होती, वचकून होती. काँग्रेसने काही एक कारणांसाठी शिवसेनेला वापरले. गेल्या नोव्हेंबरमध्ये सरकारी नोकरांचा संप झाला तेव्हाही वापरले आणि ऐनवेळी जेव्हा सरकारने पाठिंबा काढून घेतला, नव-काँग्रेसच्या नेत्यांनी शिवसेनेच्या नेत्यांवर टीकेची फैर धरली तेव्हा वाताहत झाली.

यावेळी मुंबईमध्ये श्री. यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांनी शिवसेना हे टीकेचे मुख्य लक्ष्य धरले होते. इंदिरा गांधींनी मुंबईला एकच धावती भेट दिली. पण शिवसेनेवर झोड उठविली. शिवसेनेत संघटनात्मक ताकद कधीच नव्हती. किंबहुना शिवसेना ही कोतीव अशी संघटना कधीच नव्हती. शिवसेनेला घटना नव्हती, संघटनात्मक निवडणुका नव्हत्या, कम्युनिस्ट-विरोध याशिवाय राजकीय तत्त्वज्ञानाचा कोणता ठोस पाया नव्हता. परळ निवडणुकीच्या वेळी एका पत्रकाराने घटनेविषयी विचारले असता "घटना तयार करीत बसण्याची कारकुनी आम्ही करणार नाही,' असे उद्गार बाळ ठाकरे यांनी काढले होते.

तेव्हा शिवसेना ही एक नुसती चळवळ होती. चळवळीला जसे एखाद्या लाटेचे स्वरूप असते तसे शिवसेनेचे स्वरूप होते, पण चळवळीचे मुख्य ध्येय विसरले गेले, संघटना बांधण्याकडे दुर्लक्ष केले गेले, नेते तिखटीच भाषा बोलू लागले, तेव्हा लाट ओसरली. नेत्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. ते स्वतःच्या लोकप्रियतेत मश्गुल राहिले, म्हणूनच त्यांना आता पराभव पचविणे जड जात आहे.

शिवसेनेवरच एवढे चऱ्हाट वळण्याचे कारण असे की, गेली निवडणूक ही या चळवळीच्या इतिहासात महत्त्वाची ठरणार आहे. शिवसेना टिकते की जाते असा समय येऊन ठेपला आहे. विजया-विजयांमुळे वाढत जाणारी ही चळवळ आहे. या

पराभवामुळे ती खचून गेली आहे. पराभवातून नेत्यांनी काही धडे घेतले आणि बदल करण्याचा प्रयत्न केला तरच शिवसेना आपले महत्त्व टिकवू शकेल. एरवी शिवसेना राहील. पण तिला एवढे महत्त्व उरणार नाही. शिवाजी पार्कवरील सभेतील ठाकरे यांचे भाषण ऐकले की अजून तरी त्यांना या वस्तुस्थितीची जाणीव झाली असेल असे वाटत नाही.

दक्षिण मुंबईत जॉर्ज फर्नांडिसांचीही मोठी चमत्कारिक परिस्थिती झाली. स. का. पाटलांना आडवा पाडणारा जॉर्ज आपले डिपॉझिटही वाचवू शकला नाही. कैलास आणि टाटा यांच्या लढतीत जॉर्ज पार दुर्लक्षिला गेला. कॉंग्रेसच्या एवढ्या प्रचंड लाटेची अपेक्षा त्यानेही केली नव्हती. त्याचा सारा हल्ला होता टाटांवर. पण जॉर्ज आणि टाटा या दोघांनाही मागे सारून कॉंग्रेसच्या लाटेवर आरूढ होऊन कैलास आले, जॉर्जने खिलाडूपणाने आपला पराभव मान्य केला हे तरी बरे. आपलेच चुकले, आपण लोकांपर्यंत पोचू शकलो नाहीं, आता पुन: प्रयत्न करू, असे त्याने सांगून टाकले.

पण बिचारे टाटा ! ऐन वेळी ते आत्मविश्वासाने मैदानात उतरले ते आपण बाजी मारूच या खात्रीने. शिवसेनेच्या मनोहर जोशींप्रमाणे 'मी जिंकून आलो' अशी पोस्टर्स लावायचेच तेवढे त्यांनी बाकी ठेवले होते. एरवी ते सहज निवडून आले असते पण या लाटेपुढे त्यांचेही चालले नाही. पैसा पाण्यासारखा वाया गेला.


महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी

## राजस–कथा स्पर्धा

पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'राजस' या ललित मासिकाचा ऑगस्ट १९७१ हा वर्षारंभ विशेषांक आहे. या विशेषांकासाठी 'राजस'ने महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी एक कथा-स्पर्धा आयोजित केलेली असून रु. १००, रु. ७५, रु. ५०, रु. २५ या रकमांची एकूण चार पारितोषिके आहेत.

कथास्पर्धक हा महाविद्यालयीन शिक्षणक्रम घेणारा असला पाहिजे. त्यासंबंधी एक शिफारसपत्र महाविद्यालयातून स्पर्धकाने मिळविले पाहिजे. कथेचा विस्तार साधारणत: दोन हजार शब्दांपर्यंतचा असावा. या कथास्पर्धेत कथा पाठविण्याची अंतिम तारीख २० जून, १९७१ आहे.

स्पर्धेसंबंधी अधिक तपशील 'राजस' मासिकाच्या एप्रिल अंकी बघावा.

राजस–द्वारा श्री प्रकाशन ४९५–४९६ शनिवार पेठ, पुणे ३०.

ईशान्य मुंबईत कांग्रेसच्या राजा कुलकर्णींनी तुफान आघाडी मिळवून सर्वांना पार चीत करून टाकले. जवळजवळ जिंकले म्हणून समजल्या जाणाऱ्या डॉ. आगासकरांना एक लाख नऊ हजार मते पडली. सर्व हिशेब चुकला. आगासकर आणि शिवसेनेचे करीअप्पा या दोघांची मते एकत्र केली तरी ती कुलकर्ण्यांच्या खालीच येतात. स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करून दिवस-रात्र काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची तोंडे चिमणीसारखी झाली. 'आपले काम वाढले नाही हेच खरे' असे समजून जनसंघवाले गप्प बसले आहेत. आता पुन्हा त्याच नेटाने आणि जिद्दीने १९७२ च्या कामाला लागतील. १९७६ साली पुन्हा आगासकरांची उमेदवारी ठरलेली.

लोकांच्या मनातून जुनी कांग्रेस किती उतरली आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे वायव्य मुंबई. जिथे नव-कांग्रेसच्या एच. आर. गोखल्यांनी जुन्या कांग्रेसच्या शांती पटेलांना एक लाख मतांनी लोळविले. मुंबई जुन्या कांग्रेसचा बालेकिल्ला. त्यातल्या त्यात वायव्य मुंबई! एवढ्या एकाच ठिकाणी जुन्या कांग्रेसचा उमेदवार उभा होता आणि तिथेच त्यांची ताकद एकवटली होती. इथूनच अविभक्त कांग्रेसच्या शांतीलाल शहांनी मागल्या निवडणुकीत गोखल्यांना पाडले होते आणि गोखले लाख मतांनी निवडून येतात. केवढा हा दैवदुर्विलास! जुन्या कांग्रेसची ही नामुष्की अनेक कार्यकर्त्यांना असह्य झाली आहे आणि ते आता नव्या कांग्रेसमध्ये जाण्याच्या गोष्टी करू लागले आहेत. एकेकाचे दिवस असतात.

महाराष्ट्रात इतरत्र नव-कांग्रेसची संघटना जबरदस्त होतीच आणि आपण चाळीसही जागा जिंकणार अशा गोष्टी कांग्रेसनेते करीत होतेच. एक मधू दंडवते यांची जागा सोडून दिल्यास त्यांचे बोलणे खरे ठरले. पण याचे श्रेय संघटनेएवढेच इंदिरा गांधींनाही आहे हे कुणी नाकबूल करणार नाही. परंतु आता १९७२ च्या विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत. फक्त दहा महिने. या काळात इंदिरा सरकारने बरोबर पावले टाकली नाहीत तर पुन्हा वारे उलटायचे.

निवडणुकीच्या या धामधुमीत एक गोष्ट अनुल्लेखाने मारली गेली. अशोक शहाणे, रघू दंडवते आणि इतर चार हिंदी-उर्दू-मराठी साहित्यिकांनी मतदानाच्या दिवशी उपवास केला. कशासाठी तर 'हे मक्कार, क्षुद्र राजकारणी आम्हांला मते मागून सत्ता कमावितात आणि देशाचा नाश करतात. मतदान ही यांत्रिक क्रिया झाली आहे. त्यांना मते देण्याचे पाप मागील निवडणुकीत आम्ही केले आहे म्हणून हे प्रायश्चित्त!'

□ □ □

# ही आहे भटकंती सुरींदर शर्मांची....

सुरींदर शर्मा
वाचकांच्या आता परिचयाचे आहेत.
पंजाब कृषि विद्यापीठाच्या
लुधियाना महाविद्यालयातून
एस्. एस्सी. ची पदवी घेऊन
बाहेर पडलेला हा तरुण
सध्या पीएच्. डी. प्रबंधासाठी
रत्नागिरी जिल्ह्यात सायकल भ्रमंती
करत आहे
या भ्रमंतीची एक झलक यापूर्वी
प्रसिद्ध झाली आहे
(माणूस–३० जानेवारी ७१)

# चंबळच्या घाटीतून

आग्रा शहराची रंगत पाहून पुढे निघालोय. रस्त्यात दिसलं आग्रा मेडिकल कॉलेज. विद्यार्थ्यांनी आग्रह करून बोलावलं होतं. काय बोलावं नि कसं बोलावं हा विचार करतो आहे तोच कॉलेजच्या सभागृहात गेलो. किती गर्दी ही ! रंगीबेरंगी साड्या, दुपट्टे, पॅंटस्-शर्टस्. मी बोलतोय, 'आजच्या तरुण पिढीच्या समस्या नि काळाचं आवाहन.' खूप वेळ बोलतो. प्रतिसाद देतात विद्यार्थी. अगदी तल्लीन होऊन ऐकतात नि मग होतो अल्पोपाहार. खूप मिठाई होती आग्र्याची. विचारांची देवाण-घेवाण. ओळखी. परिचय फोटो होतो मग अन् माझ्या या तरुण मित्रांचा गोड निरोप घेऊन चालू लागतो मी.

आता मात्र रस्त्याची रुंदी कमी झालीय. रहदारी वाढतेय. अवजड वजनाची

ट्रकची घुडूं, बसेस, कार चालल्या आहेत अन् त्यातच आमची ही सखी चाललीय. छोटी छोटी गावं ओलांडलीत. रस्ता कमालीचा कंटाळवाणा वाटतोय. जागजागी पंजाबी ट्रक्स भेटतात. भाषेची अडचण जाणवत नाही. रस्त्यात पाण्याची तंगी महसूस होतीय. दुसरी गोष्ट नजरेत भरलीय की इथं थोडीशी ' शिवाशिव ' आहे. लोक पाणीसुद्धा खूप दुरून पाजतात. मातीच्या भांड्यात चहा, दूध मिळतं. थोड्या वेळात राजस्थानच्या हद्दीत प्रवेश केला. भरतपूर जिल्हा. नदीचं नाव होतं ' जाजव.' रस्ता अगदी खराब. मेंटेनन्स अजिबात नाही.

२१ एप्रिलची सायंकाळ. एका मोठ्या ऐतिहासिक शहरातील. दमून भागून एका मोठ्या इमारतीपाशी उभा आहे. खूप विद्यार्थी जमलेत. प्रशस्त आवार. सफाई. उत्साही तरुण. सुळकन् एक कार उभी राहते नि आतून उतरतात विद्यापीठाचे डीन डॉ. गुप्ताजी. स्वागत होतं नि पुन्हा तेच. परिचय, अल्पोपाहार, रात्री करमणुकीचा कार्यक्रम होतो. विद्यापीठाच्या आवारात विश्राम करतो. हनुमानजयंती आहे आज. टेकडीवरच्या एका मंदिरात गेलो. भक्तांची तुफान गर्दी उडालीय. तरुण-तरुणी, वृद्ध, बच्चे लोग. कीर्तन होतंच. फुलांच्या माळा विकतात. पोरंठोरं रेवड्या घेताहेत अन् तरुणी ' मारुतीरायाला नवस ' करताहेत ! मीही भक्तिभावानं नमस्कार करतो. सकाळी उठून ग्वाल्हेरच्या त्या जिवाजीराव युनिव्हर्सिटीतून प्रस्थान केलंय. आता आहे बडा मुष्कील रास्ता.

ग्वालेर शहरातल्या त्या गल्लीबोळ तून बाहेर पडताना ५॥ झालेत. पुन्हा मेनरोडला लागलो. अजूनही रस्त्यात कोणी रहदारी नाही. दमले भागलेले ट्रक ड्रायव्हर झोपलेत. रस्ता पेंगुळलाय. कुण्या घरातनं लागलेले दिवे दिसतात. हॉटेलच्या भट्ट्या पेटल्यात. दूधवाले फिरताहेत. अन् मी ती सारी दृश्यं टिपत चाललोय. शहराच्या बाहेर आल्यावर बरं वाटतंय. १–१॥ मैल गेल्यावर नदी लागतेय. बडा मोठा पूल. पुलाची लांबी २४३४ फूट. दुतर्फा मोठी झाडी दिसती आहे. नदीच्या नावाची पाटी वाचली ' चंबळ. ' अन् तो सारा एरिया पाहून कुठंतरी काळजात धस्स झालं. पुलाच्या पलीकडे एक छोटी पुलीस चौकी होती. तिथं ' आलबेल 'चा इशारा मिळाला. आता रस्ता चांगला आहे. पण चढउतार लागले. रस्त्यात मी एकटाच चाललोय. सोबतीला कुणी नाही. ट्रकवाला नाही. पण मी आपण प्रातःस्मरण म्हणत चाललोय. चढउतार लागतात. रस्ता थोडा अरुंद झालाय. एका मोठ्या चढावरून चढलो. ८–१० मैल आलो होतो ग्वालेरहून. उतारावर उतरलो. सायकल वेगात चाललीय. एक मोठ्ठं वळण दिसतंय. वळणावर सायकल आलीय. मोठी शिळा दिसतेय. आलो. दगडापाशी आलोय. वळलो. एवढ्यात...

...ठहरो ! ठहरो !!

—आं ? हे काय ? कोण आवाज देतंय ? कुठं आहे ? काय काम आहे ? मी उतरतो सायकलवरून. इकडं तिकडं पाहतो. कुणी दिसत नाही. पुन्हा सायकलवर

बसून ब्रेक ढिला सोडतो–तोच फिर एक बार हुआ 'ठहरो.' आता मात्र पुरता हादरलो मी नि एवढ्यात एक बंदुकधारी समोरनं आला. कल्लेदार मिशा, धिप्पाड शरीर, खाकी कपडे, लाल डोळे. पूछतोय, 'कहाँ जा रहे हो?' बाररे. सांगितलं, 'महाराष्ट्रात अभ्यासाला चाललोय.' अन् एवढ्यात मागूनपुढून १५।१६ जण शस्त्रधारी उगवलेत. समजलो. कोण लोक आहेत ते. छातीशी बंदुकीची नळी लावून लुटलं. अगदी अक्षरशः विनवलं. पण छे! कशाचाच उपयोग झाला नाही. वरून सांगितलं काय, 'पुलिसको खबर नहीं देना. जिंदा छोडा है यही गनीमत समझो.' काय करावं नि काय नको या विचारातच सायकल सोडली तिथून, निर्धन, निष्कांचन.

चंबळ घाटीच्या डाकूंचा हा पराक्रम, ही गाथा. इथेच म्हणे विनोबांनी डाकूंच्या हृदयपरिवर्तनाचा प्रयोग केला म्हणे. 'मुझे जीने दो' इथेच झाला. पण मला मात्र सकाळीच हा प्रसाद मिळाला.

१–१॥ मैलावर गाव लागलं 'घाटेगाव.' छोटंसं गाव. पुलिस थाना होता. तिथून जाऊन पाहिलं. पुलिस पत्ते कुटत होते. मी तक्रार दिली तर पुलिस अधिकारी म्हणताहेत, 'हे नेहमीचंच आहे. आम्ही तरी काय करणार–?' ही आमची कर्तव्यनिष्ठा. सुरक्षा व्यवस्थेतली ढिलाई अन् पुलिस अधिकाऱ्यांच्या अक्षम्य ढिलाईमुळेच लक्षावधी रुपयांची संपत्ती डाकू लुटतात. मुलं पळवतात. हल्ले करतात त्यांच्यापाशी मशिनगन्स, रायफली येतात कुठून? कोण देतं? कसं? आमच्या यशस्वी कारभाराचं हे एक उदाहरण आहे. अन् म्हणूनच गेल्या २० वर्षांत ही डाकूसमस्या सुटू शकली नाही.

त्याच गावी 'मोहना' नदी लागली. डाकबंगला होता. तिथं एक पंजाबी हॉटल भेटलं. तिथं काही ओळखीचे ट्रक ड्रायव्हर मिळाले. त्यांना माझी हकीकत समजताच त्यांनी धीर दिला. सायंकाळपर्यंत त्यांनी मुंबई अन् दिल्ली भागांत जाणाऱ्या ट्रक ड्रायव्हरांकडून वर्गणी जमा केली नि सायंकाळी ७॥ ला माझ्या हातात ७५० रु. ठेवले. ही मदत, ही माणुसकी, अन् आमचे हे पंजाबी ट्रक ड्रायव्हर समाजात का कोण जाणे बदनाम आहेत.

सकाळी ताजातवाना होऊन सफर चालू केली. एक छोटं गाव पाहिलं. नाव घोरपुरा. तिथं श्री. रामप्रसाद तिवारी नावाचे एक संन्यासी शिक्षक भेटले. ये जनाब M. A. पास केल्यानंतर संन्यासग्रहण करून आत्मध्यान करतात. खूप प्रवास केलाय् त्यांनी. गावकऱ्यांशी बोलून सफर चालू ठेवली. सारखा चढउतार. दुतर्फा जंगल. पाण्याचा पत्ता नाही. पशू छोटे, जी काही थोडी हिरवळ होती, त्यात पशू चरतात. लोकांचा रंग, ड्रेस यांत फरक पडत चाललाय्. पंजाबात खूबसुरती आहे. इथं उलटा प्रकार.

शिवपुरी गावात I. T. I. पाहून पुढं सरकलो. आता थोडासा मैदानी एरिया

आहे. सायकल बडी मजेत चाललीय्. जागजागी रस्ता-दुरुस्तीचं काम चालू आहे मजदुरांना १।। रु. मिळतो. स्त्रियासुद्धा काम करत होत्या. आपल्याबरोबर तान्ह्या मुलांना घेऊन काम करत होत्या. खरोखर, आपल्या देशातलं हे चित्र कधी पालटणार आहे का ? का फक्त पोकळ समाजवादाच्या गप्पा आम्ही मारतोय् ?

पुन्हा रास्ता खराब. जातिभेद बहोत. जागजागी 'बिरादरी'ची चौकशी. एका हॉटेलच्या बाहेर उभा राहून उकडलेली अंडी खाल्ली तर दुकानदाराने पाणी द्यायला इन्कार केला. त्याने सांगितलं की, अंडा, मांस खाणाऱ्यांना गावात प्रवेश करू देत नाहीत !

गुना जिल्ह्याचं गाव. तिथं एक अविस्मरणीय व्यक्ती भेटली. डॉ. हाटके नाव. म. प्रदेश असेंब्लीचे आमदार आहेत. त्यागी आणि इमानदार. साधी राहणी. लोकांमध्ये त्यांच्याबद्दल अती आदर. पुढचा रास्ता जंगलातला. पहाडावर छोटी गावं. लोक बडे बॅकवर्ड. सुसंस्कृत जीवनसे बडे दूर. पाण्यासाठी खूप दूर जावं लागे. एका छोट्या खेड्यात एक जमीनदार पाहिले. २५० बिघे जमीन. परंतु शेतीच्या आधुनिक तंत्रांचा वापर नाही. लोक पुराण्या मतांचे. नवं बी, मशीन्सचा प्रभाव नाही. दुसरी गोष्ट, आपसांतले झगडे. Groupism. राजकारणी लोकांची आपसांतली सत्तास्पर्धा. या सर्व भागांत एक प्रकारची उदासीन वृत्ती दिसते आहे.

आम्ही शहरांतले लोक आधुनिक विज्ञानतंत्राच्या गोष्टी करतो. परदेशी पाहुणे भारतात येतात. त्यांना मोठमोठी शहरं दाखवतात. कारखाने पाहतात. त्यांना दाखवलं जातं, सांगितलं जातं, की भारत सुधारला आहे. प्रगती करतो आहे. परंतु ही खेडेगावं पाहिली की वाटतं, हे सारं खोटं आहे. याच गावात राहून सुधारणा करायला पाहिजे. बाहेरच्या दुनियेत केवढी प्रगती झाली, हे त्यांना सांगायला पाहिजे. पण हे कोण करणार ? शासन ? छे ! सरकारी कर्मचारी हे करायला असमर्थ आहेत. त्यासाठी त्यागी, रचनात्मक कार्य करणारे, इंटरेस्ट घेणारे आणि खेडेगावात राहणारे कार्यकर्ते हवेत.

—परंतु—?

पुढचा मुक्काम उज्जैन. महाकवी कालिदास तथा विक्रमादित्याच्या पुण्यस्पर्शाने पावन झालेली भूमी. तेथली विक्रम युनिव्हर्सिटी, शाळा तथा अन्य संस्था पाहिल्या. क्षिप्रा नदी. संस्कृतचं खूप पाठांतर होतंय् इथं. स्मरणात राहील अशी व्यक्ती डॉ. शिवमंगल मंगलसिंह सुमन, उपकुलगुरू, विक्रम विद्यापीठ. जेवण मोठं चांगलं आहे इथं.

मध्य प्रदेशच्या लोकांची तक्रार होती की, इथं लाचलुचपत खूप आहे. सरकारी कचेऱ्यांत काही 'दिल्याखेरीज' काम होत नाही. राजकारण म्हणजे एक दुसऱ्याची निंदानालस्ती, सत्तास्पर्धा. पक्षाच्या आपसी भांडणात लोकांची सुधारणा करायला वेळ कुठाय ? आणि खरोखर आजची राजनीती म्हणजे सत्तास्पर्धेशिवाय काय

आहे ? एका छोट्या गावात (पनवाडी) थांबलो होतो. तिथले एक कॉंग्रेसचे कार्यकर्ते डॉ. चंदुलाल भेटले होते. म्हणत होते 'जनसंघ सांप्रदायिक है.' खूप शिव्याशाप दिल्या संघाला. पण संध्याकाळी पाहिलं, स्थानिक पंचायतीच्या निवडणुकीसाठी मुस्लिम मतदारांची याचना करत होते.

देवास. किर्लोस्कर कारखाना. वर्क्स मॅनेजर श्री. गर्देजी भेटले. कारखाना पाहून कामगारांशी चर्चा भेट. पुढचा मुक्काम इंदोर. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचं गाव.

तिथलं स्वागत मेयो कॉलेज. तिथं एक फार मोठा माणूस भेटला. पक्का राजकारणी. मा. वीरेंद्रकुमार सकलेचा. म. प्र. च्या राजकारणातील जबरदस्त शक्ती आणि त्यांच्याच प्रयत्नाने भेटलेल्या ग्वालेरच्या राजमाता विजयाराजे सिंधिया-मातेच्या प्रेमळ वात्सल्याचं एक दर्शन. त्यांचाही शुभ आशीर्वाद मिळाला प्रवासाला. स्थानिक गेलेत परंतु जनतेवर प्रेम कसं करावं हे पाहावं राजांकडून. नाहीतर आमचे खासदार–आमदार ?

तिथलं मराठी मंडळ. सेक्रेटरी श्री. घाटे. बटुमूर्ती पण कीर्ती मोठी. मोठा चळवळ्या माणूस. मराठी साहित्यसभा, चर्चा मंडळ, नाट्यमंडळ, वेडेकर लोणच्याचं दुकान, नऊवारी साड्या पाहून अगदी पुण्याचा भास होतो. तिथं मराठी वस्तीच मुळी १–१॥ लाख आहे. मुक्कामात भेटले एक मराठी नाटककार श्री. बाबा डिके. त्यांच्याशी खूप रंगलो मी बोलताना अन् मग साहजिकच जिवाला चटका लावून गेल्या रसिकराज रामूभैय्या दात्यांच्या आठवणी. तिथल्या मराठी शाळतला कार्यक्रम. दुसरी भेट क्रिकेटिअर मुश्ताकअली अन् चंदू सरवटे. क्रिकेटच्या खूप गमती-जमती ऐकल्या नि खास आठवणीत राहिलं ते तिथल्या प्रशांत भोजनालयातलं घरगुती जेवण. इंदोर म्हणजे छोटी बंबई अन् काही भाग म्हणजे पुण्याची सदाशिव


हंसा वाडकर यांचे आत्मकथन

# सांगत्ये ऐका

सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये

राजहंस प्रकाशन

नेट. सफाई, भाषा. सौजन्य अन् मुख्य म्हणजे 'वेट' एरिया. मोठं सुसंस्कृत गाव. विद्यार्थीवर्गाशी चर्चा. माकडेरगानं. अन् आता होती ओढ महाराष्ट्राची. इंदोरचं आकर्षण 'शीशमहाल' अन् गांधी बाग. जवळ होती नर्मदा नदी अन् पाहिलं 'ओंकारेश्वर.' बारा ज्योतिर्लिंगातलं एक. नदीचा प्रवाह मोठा होता इथं. सुंदर स्थान.

पुढचं शहर महू. महूच्या लष्करी केंद्रातले पंजाबी असोसिएशनचं स्वागत. तिथला पाहिलेला राणी पुण्यावतीचा महाल. लष्करी छावणी म्हणून सफाई भरपूर. मंडलेश्वर. तंट्या भिल्लाचा विभाग. त्या रोमांचक हकिकती ऐकल्या. त्याचा देशाभिमान, पराक्रम ऐकताना मन भारावलं. सेंधवा गाव लागलं अन् आता महाराष्ट्र जवळ आलाच. तिथून पुढं आला जंगलातला रस्ता. दुतर्फा झाडी. रस्ता रुंद झालाय. ट्रॅफिक वाढतोय नि त्यातच बेकरीवाल्या ट्रकची तुफानी स्पर्धा. घाट आला. मोठा जबरदस्त घाट. घाट अर्धाअधिक संपतोय नि तेवढ्यात बॅरियर लागला. ट्रक्स-बसेस थांबल्यात. दूर एक छोटी इमारत दिसतेय. मी येतो. पाहतो. एक बोर्ड आहे. 'मध्यप्रदेश आपका आभारी है.' म्हणजे कसलं आभारप्रदर्शन? त्यांचा प्रदेश संपलाय अन् दहा फुटांवर महाराष्ट्र आनंदं सहर्ष स्वागत करीत आहे हां! म्हणजे स्वप्न साकार झालं म्हणायचं. पण...पण आपण म्हणतो देश एक आहे. कायदे एक आहेत. तिथं मात्र तसं दिसलं नाही. मध्यप्रदेशच्या हद्दीत दारूची सर्रास विक्री अन् महाराष्ट्रात मात्र दारूबंदी. (तीही पण कागदावरच!) मोटारींची–ट्रकची कसून झडती होतेच. जाऊ द्या हो! राजकारण माझा विषय नाही. परंतु माझ्यासारख्या एका सामान्य प्रवाशाला वाटतं की सगळीकडे सारखे कायदे–नियम असावेत.

आला. आला महाराष्ट्र. ज्याच्यासाठी एवढा आटापिटा केला, एवढी सफर केली, तो महाराष्ट्र. दिनांक १ मे १९७०! सुदैवानं योग असा की ह्याच दिवशी महाराष्ट्र राज्याला १० वर्षं पुरी झाली होती. त्या पवित्र दिवशी महाराष्ट्राच्या भूमीला स्पर्श केलाय, महाराष्ट्राच्या पावन भूमीला! शिवरायांच्या!! त्या महाराष्ट्र दर्शनाची ही दुसरी फेरी!!!

# मराठवाड्याची हालहवाल

देवदत्त तुंगार

## जनमताचा कौल

मध्यावधी लोकसभेच्या निवडणूक निकालाने सर्व देशच ढवळून निघाला असून इंदिरावादी नव-कांग्रेसने जो नेत्रदीपक 'पराक्रम' करून सर्वच विरोधी पक्षांचे 'पानशेत' (व पानीपत ?) केले आहे. या अभूतपूर्व विजयाचे विश्लेषण जो तो आपआपल्या परीने करीत आहे. मनमोकळेपणाने पराभव मान्य करण्यासही फार मोठे मन असावे लागते. सुदैवाने अटलबिहारी बाजपेयी, मिनू मसानी आदी विरोधी पक्षीयांनी, तसेच एस. एम्., नानासाहेब गोरे इत्यादींनी मुदतपूर्व निवडणुकीने जनमताचा कौल इंदिरा गांधींच्या बाजूने पडला आहे हे मान्य केले आहे. बाळासाहेब ठाकरे, निजलिंगप्पा यांच्यासारख्या लोकांनी निवडणुकीतील 'गैरप्रकार' व 'आश्चर्यकारक' निकाल यासंबंधी टीका केली आहे. अशा आरोपात थोडेफार तथ्य असले तरी स्थूलमानाने लोकमताचे प्रतिबिंबच निवडणूक निकालात प्रतिबिंबित होते ही गोष्ट संसदीय लोकशाहीवर ज्यांचा विश्वास आहे त्यांनी मान्य केली पाहिजे.

'माणूस'मध्ये निवडणूक वार्तापत्रात मराठवाड्यात बहुतेक सर्वच, सातही, जागा नव-कांग्रेसलाच मिळतील व कांग्रेस विजयी होईल, असा 'अंदाज' व्यक्त केला होता. अपेक्षेपेक्षा जास्त बरोबर अंदाज ठरला. नव-कांग्रेसचे उमेदवार अपेक्षेपेक्षा अधिक मतांनी विजयी झाले. या विजयात कांग्रेसची प्रचारयंत्रणा, ना. शंकरराव चव्हाण, बापूराव कदम, बाळासाहेब पवार, काळे, कांबळे, पालोदकर, शिवाजीराव देशमुख, पंडित इत्यादींचा वाटा निश्चितच आहे, पण मतांची जी अभूतपूर्व आघाडी कांग्रेसच्या उमेदवारांनी मिळविली त्यात भारतभर पसरलेल्या 'इंदिरा-जाळ' (इंद्रजाल-जादू)च्या छुबेचाही फार मोठा भाग आहे.

मराठवाड्यातील कांग्रेस विजयाने कांग्रेसच्या गोटात 'जल्लोषा'चे वातावरण निर्माण झाले आहे. विजयी उमेदवारांच्या मिरवणुकी १५ मार्चपर्यंत चालू होत्या. विरोधी पक्षांत-विशेषत: संसोपा व जनसंघात–नैराश्य निर्माण होणे हे स्वाभाविक म्हणावे लागेल. शे. का. प. चे नेते आमदार केशवराव धोंडगे यांनी मात्र कांग्रेसच्या विजयाने जनमताचा कौल इंदिराजींच्या बाजूने पडला असून विरोधी पक्षीय कामात

कमी पडले, आता निर्धाराने विरोधी पक्षीयांनी कामाला लागावे, जनतेशी अधिक सेवा करून बळ वाढवावे, असे समयोचित आवाहन केले आहे.

स्थानिक दैनिकांतून मराठवाड्यातील मतदानाचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत. ते मतदानाचे आकडे पाहिले असता विरोधी पक्षांतील फाटाफुटीचा काँग्रेसला फायदा मिळाला, फाटाफूट झाली नसती तर काँग्रेसला पराभूत करता आले असते असे म्हणण्यालासुद्धा जागा नाही. कारण काँग्रेसविरोधकांची सर्व मते एकत्र केली तरी काँग्रेस उमेदवारास मिळालेल्या मतांपेक्षा ती कितीतरी कमी आहेत. मराठवाड्यातील काँग्रेसचे हे यश 'निर्विवाद' आहे. जनसंघ आणि संसोपाचा प्रचार जोरात होता, औरंगाबाद मतदारसंघातून श्री. रामभाऊ गावंडे, जालन्यामधून संसोपाचे श्री. बापूसाहेब सोळंके, लातूरमधून श्री. तुकाराम शृंगारे (संसोपा) हे नक्की निवडून येणार असा सारखा प्रचार चालला होता. 'मराठवाडा' व 'प्रजावाणी' या दैनिकांनी तर संसोपाचे उमेदवार किती 'लीड'ने येणार हेही जाहीर करून टाकले! मतपेटीचा निकाल 'बाहेर' आल्यानंतर मात्र या सर्वांचा भ्रमनिरास झाला. या निवडणुकीच्या वेळी प्रचाराची पातळी विरोधी पक्षीयांनी फारच खाली आणली होती हे मात्र अमान्य करता येणार नाही. अर्थात त्याला उत्तर देण्यास काँग्रेसही उणी पडली असे समजायचे कारण नाही. आता निवडणूक संपली असल्याने 'कवित्व'ही संपेल.

## देगलूर कॉलेजचा अभिनंदनीय उपक्रम

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील कॉलेजने गेल्या वर्षीच्या उन्हाळ्याच्या सुटीपासून एक अभिनंदनीय उपक्रम सुरू केला आहे. श्रमसहभाग प्रकल्प हे त्याचे नाव. प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी महाविद्यालयाच्या आवारात सुमारे २०० वृक्ष लावले. एक फर्लांग अ‍ॅप्रोच रोड बनविला व विशेष महत्त्वाचे कार्य म्हणजे इमारतीच्या बांधकामासाठी नियमितपणे श्रमदान करून वर्षभरात सुमारे २० हजार रुपयांचे काम केले. २६ जानेवारी, गांधी जयंती किंवा अन्य 'शुभ-प्रसंगी' 'नैमित्तिक' कार्य म्हणून तास-दोन तास श्रमदानाचा 'शो' करण्याऐवजी श्रमदान सातत्यपूर्वक वर्षे न वर्षे चालावे व त्यातून काही भरीव कार्य प्रत्यक्ष दिसावे अशी देगलूर कॉलेजची श्रमसहभाग प्रकल्पाची कल्पना आहे. प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी, प्रा. मनोहर, प्रा. बळरावत, इतर प्राध्यापक व ५० विद्यार्थी यांनी नियमितपणे वर्षभर श्रमदान केले. वसतिगृहात राहणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांनी श्रमदानात प्रामुख्याने भाग घेतला व त्यांनाही कॉलेजने भोजन आदीची मदत दिली. विद्यार्जन करीत असताना धनार्जन (Earning while Learning) करण्याची सोय पर-

देशांत असते. काही अंशी तशीच योजना अल्पांशाने का होईना देगलूर कॉलेजने कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे. प्रकल्प कायम स्वरूपाचा असून त्यातून झालेली ' निर्मिती ' हा अभिमानाचा विषय आहे.

## आर्यसमाजाचा प्रचार करणारी ' स्पेशल ट्रेन '

भारतातील प्रमुख शहरांतून आर्य समाजाचा प्रचार करण्यासाठी सुमारे ५०० स्त्री-पुरुषांची ' भारत–यात्रा स्पेशल ट्रेन ' दिल्लीहून निघाली असून नांदेडला एक दिवस थांबली होती. शहरामधून या आर्यसमाजी कार्यकर्त्यांची एक मिरवणूक काढण्यात आली. मोंढा मैदानावर जाहीर सभा घेण्यात आली. सभेत ' हिंदुस्थान ' दैनिकाचे सहसंपादक श्री. सतीशचंद्र वेदालंकार, श्री. देवराज चढ्ढा व स्थानिक ' वैदिक सेवाश्रम 'चे संस्थापक श्री. शिवराम जिंदम ऊर्फ शिवमुनी यांची भाषणे झाली. गाय-वासराचे चिन्ह घेऊन निवडून आलेल्या नव-काँग्रेसने आता गोवध बंदी करावी, असे प्रतिपादन काही वक्त्यांनी केले. श्री. सतीशचंद्र यांनी नांदेडचा स्वतंत्र वीर बंदा बैरागीशी फार घनिष्ठ होता असे सांगून बंदा बैरागी हा राष्ट्रीय नेता होता. त्यास ' हिंदु–राष्ट्र ' स्थापन करायचे होते पण आपल्याच लोकांनी त्याला साथ दिली नाही. फरूकसिअरला मात्र आपल्या लोकांनी सहकार्य दिले. असा हा वीर योद्धा विस्मृत होऊ नये म्हणून त्याच्या स्मारकासाठी सर्वप्रथम आर्यसमाजनेच पावले उचलली, असे सांगून ख्यातनाम इतिहासकार श्री. गेंडासिंग यांनी बंदा बैरागीस किती श्रेष्ठ स्थान दिले आहे याची माहिती श्री. सतीशचंद्र यांनी दिली.

आर्य केंद्रीय सभा, नवी दिल्ली या संस्थेमार्फत ही ' स्पेशल ट्रेन यात्रा ' भारत दौऱ्यावर निघाली असून नांदेडहून निजामाबाद, हैद्राबादचा दौरा करीत दक्षिणेत जाईल व तेथून पुन्हा दिल्लीस पोचेल. या यात्रेकरूत दोनशेपेक्षा अधिक महिला आहेत. चार-पाच महिला उत्तम वक्त्या असून इतर महिला भजने फारच सुंदर गातात ! नांदेडमध्ये एक दिवस का होईना बरेच ' चैतन्य ' निर्माण झाले I

□ □ □



# आवर्त

“ जळलं मेलं वीज–बोर्ड !”

रागारागातच एक बुक्की मी लिफ्टच्या पुश-बटनावर मारली. तशी मलाच उलट लागलं. रोजच कशी लाईट जाते अन् तीही नेमकी संध्याकाळी! आता अंधारातून जिने चढून जाण्याचं जणू माझ्या जिवावर आलं होतं. दिवसभराची

सर्वसाधारणपणे नर्सेस धीट असतात, पण त्यांनाही कधी कधी असा अनुभव येतो ! लेखकाच्या पत्नीचा हा स्वानुभव. सिव्हिल हॉस्पिटल, औरंगाबाद...

**चंद्रकांत अंबाडे**

---

ड्यूटी संपवून आज फारच थकले होते मी. शरीर कसं नुसतं पिचून गेलं होतं. तशात नेमका पीडीयाट्रिक-वार्ड मला. चिल्ली पिल्ली पोरं भंडावून सोडत अगदी. आज तर कहरच झाला. एका पाठोपाठ चार सिरियस केसेस ॲडमिट झाल्या. मग नंतरची धावाधाव पूर्ण परिचयाची झालीय आता. कुणाला सलाईन द्या, तर दुसऱ्याला ऑक्सीजन सुरू करा, तर तिसऱ्याला इंजेक्शन द्या, चौथा ऑपरेशन थिएटरला पाठवण्याची वाटच पहात असतो. तोवर पहिला तोंडावर फडकं टाकून परत आणला जातो आणि त्याचा मृत्यूपास बनविण्याची घाई पुन्हा सुरू होते. कधी एकदा रिलिव्हर मुलीच्या हातात वॉर्ड सोपवून बाहेर पडते असं होऊन जातं आणि त्याच विचारात—त्याच सुखद विचारात—मी हॉस्टेलपर्यंत कशी येऊन पोहोचले ते मात्र मलाच समजलं नाही आणि आता पाहाते तो लिफ्ट बंद ! वाटलं, जिने चढण्यापेक्षा इथेच बैठक ठोकावी, पण मी युनिफार्ममध्ये होते ना ! एकदम भक्‌दिशी लाईट आले तर ?

जडजड झालेल्या शरीरासह, जडजड पायांनी अंधारातच मी चाचपडत जिना चढायला सुरुवात केली. अंधारात जपून चालणं जमत नव्हतं. वरून येणाऱ्याने मला धडक देऊ नये म्हणून मुद्दाम पायऱ्या वाजवीत होते. सगळीकडे शांतता होती. त्यामुळे तो आवाज उगाचच मोठा भासत होता. एवढयात जिन्याच्या वरच्या घुमटात दोनतीन कबुतरे फडफड फडफडली आणि ओरडली. तो आवाज घुमटात घुमला. क्षणभर मीही घाबरलेच. विचारांच्या भरात मी किती जिने चढले ते माझं मलाच समजलं नाही. भित चाचपडत मी खोलीच्या दरवाज्यापर्यंत आले. मनात आलं, खोलीत अंधाराचा फायदा घेऊन कुणी...! ! नकळत दार ढकलून आत गेले आणि तेथेच थांबले...दचकून...शब्द फुटेना एकही...! मधल्या टेबलावर पाच-सहा व्यक्ती कोंडाळं करून बसल्या होत्या. लहानशी मेणबत्ती फडफडत होती. तिच्या कमीजास्त होणाऱ्या प्रकाशात कुणाचाही चेहरा ओळखू येत नव्हता, प्रत्येक चेहऱ्याचे दोन दोन विस्फारलेले डोळे मात्र माझ्यावर रोखले गेले होते. वाऱ्यामुळे प्रत्येकीच्या सावल्या भिंतीवर सैरावैरा धावत होत्या. मधला फॅन, मेलेल्या वटवाघळाप्रमाणे छताला लोंबकळत होता. श्वास रोखून एकेक पाऊल टाकीत मी पुढे झाले ! कित्येक सेकंद जणू शांतता पसरली.

"अय्या, स्टाफ तुम्ही ? उपाध्ये स्टाफ ?" दोघीजणी ओरडल्या. म्हणजे त्या सान्या स्टूडंट ट्रेनी मुली होत्या तर. एकदम मनावरचं मोठ्ठं दडपण दूर झालं. मिणमिणत्या प्रकाशात त्यांनी मला ओळखलं होतं.

"तुम्ही साऱ्याजणी माझ्या खोलीत काय करता आहात ?"

"स्टाफ, तुम्हीच माझ्या खोलीत आला आहात. मी ... मी कुलकर्णी सेकंड ईयरची सुधा कुलकर्णी मी !"

म्हणजे खोली बरोबर होती, पण मजला चुकला होता माझा. वरच्या मजल्यावर शिकाऊ नर्सेसच्या खोल्या होत्या तेथें मी आले होते.

"सॉरी मुलींनो" म्हणून मी जावयास निघाले...पाठ फिरवली. तशी दोघींनी येऊन मला पकडले...घट्ट पकडले...

"स्टाफ तुम्ही जाऊ नका."

"उपाध्ये सिस्टर, थांबाना इथंच !" दुसरी.

"अग पण का ?"

"आम्हाला भिती वाटते !"

"भिती ? कसली भिती ?" माझ्यातला अधिकार जागा झाला व आवाजात उतरला, "लाज वाटते का म्हणायला ? आता पुढच्या वर्षी थर्ड ईयरला जाणार तुम्ही, स्टाफ नर्सेस होणार तुम्ही आणि अंधाराची भिती वाटते म्हणे. आँ ?"

"अंधाराची नाही. तर ही...ही गोष्टी सांगते. भुतांच्या !"

"कोण ही ?"

माझ्या प्रश्नाला उत्तर आलं नाही. मेणबत्तीचा प्रकाश अपुरा होता. पण तरीही मुलींच्या आवाजावरून त्या घाबरलेल्या दिसत होत्या. मग मीच आवाज मृदू करून, एकीच्या खांद्यावर हाताने थोपटीत विचारलं.

"कोण सांगते गोष्टी ?"

"ही गायकवाड म्हणते की, वॉर्डमध्ये मेलेल्या पेशंटसचे आत्मे म्हणे इथच फिरतात आणि म्हणे भूत होऊन त्या त्या नर्सेसना...!"

"आणि ते फक्त गायकवाडलाच दिसतात ? तुम्हा आम्हाला कुणाला दिसत नाहीत ते आत्मे ?... मी विचारले.

"नाही स्टाफ" गायकवाड चिरचिरली "ज्या तिथीला पेशंट मरतो, त्याच फक्त तारखेला तो आत्मा येतो आणि..!"

"चुप !" मी तिला गप्प केले. "भाकडकथा सगळ्या. नर्सेस म्हणणे सुशिक्षित धीट मुली तुम्ही, असल्यावर काय विश्वास ठेवता ? किती जणींनी बघितलंय भुताला ?" प्रश्नाला उत्तर आले नाही. सगळ्याजणी एकमेकींना खेटून चुपचाप उभ्या होत्या. मग मीच सुरवात केली. "मला नाही कधी दिसलं ते. तायगं गायकवाड ?"

पण गायकवाड केव्हाच अंधारातून सटकली होती मागच्यामागे. इतक्यात भक्‌कन्‌दिशी दिवे आले आणि "हूऽहूऽ!" करून सान्या होस्टेलमधून आवाज आला. मुली भराभर पांगल्या आणि जेवायला पळाल्या. बेशुद्ध पेशंटला कोरॅमिन दिल्याप्रमाणे, मुलींचे होस्टेल पुन्हा जिवंत झाले आणि खोल्याखोल्यातून किलबिल सुरू झाली.

ह्या प्रसंगाला महिना उलटून गेला आणि मीही जवळजवळ विसरून गेले त्या दिवशी अचानकपणे माझी नाईट सुपर डयूटी लागली. का तर म्हणे सध्याच्या नाईट-सुपरचे मिस्टर सुटीवर घरी आले होते. क्षणभर मनात मला तिचा हेवा वाटला. दुपारीच थोडीशी झोप काढली, आणि संध्याकाळी लौकरच जेवण आटोपून मी डयूटीवर हजर झाले. नाईट-सुपर म्हणजे सगळ्या वॉर्डस्‌वर देखरेख करणारी सिनियर नर्स, ती रात्रभर हॉस्पिटलची इन्‌चार्ज असते पूर्ण! आधी मॅटर्निटी वॉर्ड पाहिला. पण कोणीही बाई दाखलच झाली नव्हती. ओपीडीच्या फोनवरच्या कंपाउंडरने 'सब ठीक' सांगितले. आजची 'पहिली रात्र' सुखाने जाणार तर! ह्या विचारातच मी माझ्या डयूटीरूमवर आले आणि पेपर्स पहाण्यास बसले!

"सिस्टर साब रौउड लेनेको चलना हं?"

म्हाताऱ्या रामशरण भैयाने मला आठवण करून दिली. सैन्यातून रिटायर झालेला हा भैया दंडा आपटीत फिरत असे रात्रभर. एका वार्डातून दुसऱ्यात जायला जरी फरशीचा बांधलेला रस्ता होता. त्यावर दिवे होते, तरीही रात्री मुलींना बिचारा सोबत करायचा. आताही मला त्याने गरम गरम चहा आणून दिला. 'नर्सेस क्लब'तून आणि राऊंडला जाण्याची आठवण केली. रिस्टवॉच पाह्यलं. साडेदहा वाजून गेले होते. मी पटदिशी उठले. हो, कुणी सिरियस असो नसो, काम असो नसो, प्रत्येक वॉर्डमध्ये जाऊन पहाणे, त्या त्या नर्सला सूचना करणे पाहिजेच की! शिवाय मॅटर्निटी वॉर्डला ही नायर आहे आज. बागेत त्या रहमान मेहतरा-बरोबर गप्पा मारीत बसली असेल मजेत!

विचार करता करताच मी आयसोलेशन वॉर्डमध्ये आले. सगळा वॉर्ड शांत होता. पेशंटस् झोपा येत नसल्याने अंथरुणातच चुळबुळ करीत होते. जांभया देत होते. कराकरा पाठी खाजवत होते आणि शांततेमुळे तो आवाज कानाला कसातरी लागत होता. मला पहाताच डयूटीवरच्या मिस् गोंदेकरने मला 'गुड इव्हिनिंग' केलं व हातानेच खुर्चीवर बसण्यास सांगितले. लिहीत असलेले कागद बंद करून ती पटदिशी राऊंडला माझेबरोबर आली. त्यानंतर मग सर्जिकल वॉर्ड, मेलवॉर्ड, चिल्ड्रेन वॉर्ड, टीबी वॉर्ड संपवून मी कॅज्युअल्टीला आले पण आज तिथेही काही गडबड नव्हती. एरव्ही मारामाऱ्या करणाऱ्या दारूड्यांना चाकसुऱ्यांसह ओपीडीला आणले जाते आणि पोलिसांना बाजूला करून जखमींना बॅन्डेजेस करावी लागतात. विचार करीतच मी शेवटच्या मॅटर्निटी वॉर्डला आले.

ह्या वॉर्ड मात्र इतरांपेक्षा तोडून दूर होता आणि माडोवरती होता. ह्या वॉर्डला 'झोप' कधीही ठाऊक नाही. अखंड मंत्रजागराप्रमाणे सदैव कुठून तरी 'टयॅह्यँ टयॅह्यँ" ऐकू येत असते. मग पोरांना झोपविण्यासाठी 'हातरे, कुनी मारलं?'... सुरू होते. सदानकदा येथे ॲडमिट व्हायला आलेल्या "पाठराखीणी करवल्या" तेथेच भिरीभिरी पाहात असतात. भाड्याकरिता खोळंबलेले टांगेवाले शेवटी पटांगणात तेथेच घोड्यासमोर गवत टाकून बिड्या ओढीत बसतात, बाश बिचाऱ्या पोटाला हात लावून कण्हत असतात आणि ह्या सगळ्याला 'जबाबदार' असणारे प्रत्येकीचे जबाबदार नवरे, आमच्यावर जबाबदारी टाकून पसार होतात. हे सारं पाह्यल्यावर विचार येतो नकोच मेलं ते लग्न, अन् नकोच तो संसार!

माझ्या येण्याची चाहूल लागताच, डुलक्या घेणारी रखमा भगीण सावरून नीट उठून बसली आणि खराटा मोकळा करून नीट बांधण्याचे काम तिने पुन्हा सुरू केले. जिन्यातच एक पूर्ण दिवस भरलेली बाई मला पाहाताच उभी राहिली. तिच्या अंगावर हॉस्पीटलचे कपडे नव्हते, तरीही मी तिला विचारलंच.

" काग बाई, थंडीचं कशाला बाहेर आलीस? चांगलं पांघरूण घेवून आत झोपावं की नाही?"

यावर ती फक्त हसली आणि माझ्याबरोबर पायऱ्या चढू लागली. जिन्यात दिवा नव्हता पण कंपाऊंडच्या दिव्याचा कवडसा भिंतीवर पडला होता. तेवढ्यात मी पाहून घेतलं. रंग गॅरंटीड पक्का काळा, कपाळावर रुपयाएवढं कुंकू. गाठ मारलेली लहानशी चोळी, हातात बोजड बांगड्या. मी विचारलं.

" नाव काय तुझं?"

' सोनुबाई...सोनुबाय..." आणि ती अडखळली. मी वर मान करून फक्त तिच्याकडे पाहाताच ती काय ते समजली.

" सोनुबायी भागू कांबळे."

" भागू काय काम करतो?" माझा दुसरा प्रश्न.

" हमाली. हातगाडी हाय त्येची."

" राहातेस कुठं?"

" झोपडपट्टीला. पाणचक्कीच्या मागं."

" कितवी खेप?" माझा सराईत सवाल!

" पाचवी."

" मग आता चार खेपा झाल्या तुझ्या, तुला कळत नाही का? इथं कशाला जिन्यात अंधारात येवून बसलीस. इथंच काहीतरी झालं म्हणजे? कागद काढलायस का?"

" व्हय जी!"

" तपासायला आधी आलीस का कधी? तारीख दिलीय का?"

" व्हय की ! इस तारीख दिलीय."
" मग कधी आलीस ?"
" दोपारीच, चारला. "

बोलता बोलता आम्ही वॉर्डमध्यें आलो होतो. मी समोरच्या कॅलेंडरकडे पाहिले, बरोबर वीस तारीख होती आज वॉर्डातल्या बाकावर तिला बसायला सांगून, तिची नाडी टेंपरेचर हातानेच पाहूयलं.

" पोट दुखतंय का ?"
" नाय जी !"
" काय काळजी करू नकोस. सकाळपर्यंत मोकळी होशील हं. "
" सिस्टर मी तुमच्याबरूबर यिवू ?"
" कुठं ?"

" लई चांबल्या बोलताय तुमी ! इथं कुणीबी बोलत न्हाई नीट. समद्या रूंडू-मुंडू तरी, नाहीतर येस्फेस् तरी !"

" बरं बरं. जा आता खाटेवर जावून झोप. पोट दुखायला लागलं की बोलाव आणि ह्या वार्डची सिस्टर आहे ना, तिला विचारल्याशिवाय कुठं बाहेर गेलीस तर याद राख. तुझं लेकरू ठेवून, तुला एकटीला घरी पाठवीन बघ !"

" नाय बाय ! नाय बाय ! आगाई गं ! " करीत ती बाथरूमच्या बाजूला निघून गेली. इतक्या वेळात, रखमाने वॉर्डच्या नर्सला 'शोधून' आणले होते आणि हलक्या पावलांनी आत येवून, टेबलावर कामात ती 'गुंग' झाली होती. तिच्या-कडे 'पाहायला' हवे होते जरा.

" व्हॉट नायर, युवर पेशंट-दॅट फुल्-टर्म-लेडी–सिम्प्ली वॉण्डरींग औटसाईड ? ॲन्ड व्हेर् वेर् यू ?"

नायरने तोंडाचा चंबू केला, " अय्यो ! नो सिस्टर, आई वाज हियर ओन्ली. "

" व्हॉट हियर ओन्ली ? अगर वो औरत की बाहर डिलिव्हरी होती तो ?"
" कोनसा ओरत ?"
" यू डोण्ट नो युवर पेशन्टस् ?"

आणि तरफडतच मी बाहेर पडले. का कोण जाणे, मला अलिकडें त्या मुलीचा रागच यायचा. नवीन ट्रेनिंगला आली तेव्हा कशी मुग्ध अबोल होती जणू ! पण अलिकडे ते काळ्या ओठांना भडक लिपस्टिक काय, भारीभारी साड्या काय, स्लीव्हलेस काय ? अन् दिवसपाळीला कोण ड्यूटीवर आहे कोण जाणे. इन्स्ट्रक्शन्स लिहून ठेवायला पाहिजेत की, त्या भागूच्या नवऱ्याला बोलावून घ्या म्हणावं इकडे. झोपडपट्टीतला हमाल आणि पाच पाच खेपा हिच्या ! विचारातच मी माझ्या ड्यूटी-रूमवर आले. बापरे, साडेबारा. म्हणजे राऊंडला पक्के दोन तास लागले होते तर ! आणि रात्री बाराला तारीख बदलते तो नव्या दिवसाचा रिपोर्ट ?

पट्दिशी मी कामाला बसले. सगळ्या वॉर्डसच्या पेशन्टस्‌ची टोटल-बेरीज काही जमेना. मग त्या त्या वॉर्डला फोन करणे, पुन्हा बेरजा करणें, पुन्हा फोन करणे. दीड वाजता एक मुलगा अॅडमीट झाला. त्याच्या बरोबरच्या रूम-मेटस्‌बरोबर वाद घालता घालता किती वेळ गेला. म्हणे आमच्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलना कळवू नका ! पुन्हा रिपोर्ट लिहित्यात बसले. त्याच मनस्थितीत तीनला आणखी एक राउण्ड घेतला. पण बाळंतपणाच्या वॉर्डला जावूनही सोनूबाई कांबळेची चौकशी विसरले. सगळं काम संपवून मान वर केली, तेव्हा बाहेर फटफटलं होतं की ! हळू-हळू लोकांची वर्दळ सुरू झाली. सकाळचा चहा आला. शेवटचा राऊंड मी सुरू केला. प्रत्येक वॉर्डात जावून, त्या त्या नर्सने लिहिलेल्या रिपोर्टांवर सह्या करणे, त्याप्रमाणे डे-ड्यूटीच्या मुलीला सूचना लिहून ठेवणे सुरू झाले. मॅटर्निटी वॉर्डचा रिपोर्ट वाचता वाचता मला एकदम सोनूबाईची आठवण झाली. मी संपूर्ण रिपोर्ट वाचला. पण त्या रात्रो कुणीही बाळंतीण झाली नव्हती ना 'गेलो' नव्हती इतकेच काय पण नवीन अॅडमिशन्स रकान्यातही सोनूबाईचं नाव नव्हतं. शेजारी उभ्या असलेल्या नायरला विचारलं.

"ओ सोनूबाईको अॅडमिट नही किया अबतक ?" "चार बजे आयी थी."

"कोन शोनूबाय ?"

मग मी तिला सर्व समजावून सांगितले, तोवर आणखी दोघीजणी दिवस पाळीच्या नर्सेस तेथे आल्या. पण माझं बोलणं कुणालाच कळेना. इतक्यात रखमा तिथे आली.

"रखमा, काल रात्री ती गर्वारशी बाई आली होती किनई इथं व्हराण्ड्यात ? तू खराटा सोडून बांधीत होतीस बघ."

"हो."

"काय नाव म्हणालात सिस्टर ?" गोंदेकरने मध्येच विचारले.

"सोनुबाई कांबळे. नवऱ्याच नाव...भागू किंवा...!"

"सोनुबाई कांबळे ?" रखमाने विचारले.

"हा, ठाऊक आहे का तुला ?" मी उत्सुकतेने.

' ती झोपडपट्टीतली ?"

"हा, हा, तीच ती...!" माझी उत्सुकता शिगेला पोहोचली.

"ती तर मेली, एक्स्पार झाली." रखमाचं इंग्लिश.

"आ ? केव्हा गेली." दोघी तिघी एकदम म्हणाल्या !

"अय्यो, मरगया ?" नायर ओरडलीच जणू.

"कशामुळे गेली ती ?"

"बाळंत होता होताच गेली ती. अन् ते पोर बी गेलं." झाडून कचरा टाकून दिला हे सांगावं इतक्या शांतपणे रखमा म्हणाली. क्षणभर सर्वजणी स्तब्ध झाल्या

सर्वांचे चेहेरे भकास भासले मला.

"आणि मग डेथ कुणी सर्टिफाय केला? मला कसं कुणी कळवलं नाहीं? व्हॉट नायर?"

बिचारी नायर रडवेली झाली होती. कपाटातली सगळी चार पाच बुके तिने चाळायला सुरुवात केली, अगदी 'डेथ–रजिस्टर'सुद्धा!

"सिस्टर, हमकू कुचभीं मालुम नही जी। ये देखो ॲडमिशन–रजिष्टर, इसमें एन्ट्री नही। ये जनरल आर्डर बुकमें एन्ट्री नही."

बोलता बोलता तिने रजिष्टर्स माझ्यासमोर धरली. मध्ये हात घालून बाकीच्यांनीच एकेक हस्तगत केले. मी एक दीर्घ निश्वास सोडला. काहीतरी भयंकर किटाळ घालून ठेवले आहे जणू माझ्यावर. नाईटसुपर त्या संपूर्ण रात्रीतील प्रत्येक गोष्टीला जबाबदार असते. आता सर्वांना हे समजलेच जणू! माझ्या डोळ्यांसमोर वर्तमानपत्र फडफडले. मोठ्या हेडिंगमध्ये होते "सरकारी इस्पितळातील गैरकारभार" आणि मग ती खात्यामार्फत नसती चौकशी...तोवर नोकरी सस्पेंड...राम...राम!!

"मग मला बोलवायचं की नाही? नाईट सुपर कशाला असते?"

मी उगाचच रखमाला म्हटलं. जरा आठवल्यासारखं करून ती म्हणाली,

"तवा तुम्ही नव्हतात इथं जणू!"

"व्हॉट नॉन्सेन्स! मी बाहेर तरी गेलेय का अजुनो?"

"हें पाहा सिस्टर, ही इथं एन्ट्री आहे डेथ-रजिस्टरमध्ये." एकीने माझ्यासमोर रजिस्टर धरले. तशी सर्वांनी कोंडाळं करून आपापली डोकी घातली. ती मुलगी वाचू लागली,

"...नाव सोनाबाई भागुजी कांबळे, वय तीस. राहाणार झोपडपट्टी. ॲडमिटेड फोर पी. एम., एक्सपायर्ड वन थर्टी ए. एम. सिव्हिल सर्जनची सही आहे. तारीख आहे २० जानेवारी..."

"अय्या, आज आहे एकवीस एप्रिल!" एकजण.

"मग काल आली होती ती कोण?" दुसरी.

पण मला बुकातील अक्षरे दिसत नव्हती ना काहीही ऐकू येत नव्हते. दिसत होता फक्त अंधार! काळाकुट्ट अंधार!

□ □ □

# अखेरची सफर

विजयानंद बर्फे

डिसेंबर १३, सन १९३९ !

बुधवारचा दिवस !

सकाळचे साडेसात वाजलेले होते.

दुसऱ्या महायुद्धातील एक अत्यंत नाटयपूर्ण संग्राम युरुग्वेच्या किनाऱ्याजवळच जवळ जवळ संपत आला होता. तसा तर ह्या भीषण नाटयाचा एक अंक संपत आला होता.

जर्मन युद्धनौका 'अॅडमिरल ग्राफ स्पी' भयंकर माऱ्यात सापडली होती. तसं म्हटलं तर ही युद्धनौका म्हणजे जर्मनांचे विजयाचे आशास्थान व वैभव होती. 'समुद्रव्याघ्र' म्हणून ही ओळखली जात होती. गेले काही महिने ही समुद्रावर थैमान घालीत होती. तिच्या माऱ्यात येणाऱ्या दोस्त राष्ट्रांच्या जहाजांना तिने जलसमाधी दिलेली होती. आतापर्यंत जवळजवळ ५०,००० टनी जहाजे ग्राफ स्पीने निर्दयपणे नष्ट केली होती.

पण तीच अजिंक्य भासणारी ग्राफ स्पी कचाटयात सापडलेली होती. एका बाजूने 'HMS एक्झीटर' व दुसऱ्या बाजूने 'HMS अजॅक्स' व 'HMNZ अचिलेस' तिच्यावर अव्याहतपणे दारूगोळयांचा भडिमार करीत होते. ग्राफ स्पीला अचानकपणे ह्या दुहेरी तिहेरी माऱ्याला तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे तिचा मारा कमकुवत झालेला होता. दीड तासांच्या घुमश्चक्रीनंतर ग्राफ स्पीने युद्धातून पाठ फिरविली व किनाऱ्याकडे धाव घेतली.

अजॅक्स व अचिलेसवर असलेल्यांचा आपल्या डोळयांवर विश्वास बसेना, की हे काय झालं अशी ? एकाएकी ग्राफ स्पीने पाठ का दाखवली ? पण अजॅक्सचे कमांडर

हेन्री हारवूड यांनी तावडतोब दोन्ही क्रूझर्सना संरक्षित अंतरावरून ग्राफ स्पीचा पाठलाग करायला सांगितला. एक्झीटर फारच वाईट रीतीने नादुरुस्त झाली होती. तिने तावडतोब फॉकलंड बेटाकडे दुरुस्तीसाठी धाव घेतली. अजॅक्स व अचिलेसने पाठलाग चालविला.

ग्राफ स्पीने कोणताही ध्वज न फडकविता व कोणतेही दिवे न लावता नदीच्या मुखातून युरुग्वेची राजधानी मॉन्टेव्हिडिओ या तटस्थ बंदरात आश्रय घेतला. इकडे अजॅक्स व अचिलेस ह्यांनी युरुग्वेच्या समुद्रहद्दीबाहेर ठाण मांडले. समुद्र-व्याघ्र माघार घेऊन पळाला होता. शिकारीच आता शिकार बनला होता.

ग्राफ स्पी बंदरात आली आहे हे वृत्त कळताच नागरिकांनी तिला पाहण्यासाठी बंदराकडे व किनाऱ्यावर धाव घेतली. लोकांची अक्षरशः रीघ लागलेली होती. त्यांची मने भीतीने व उत्सुकतेने भारून गेलेली होती. कारण ग्राफ स्पी ही युद्धनौका होती. शांततेच्या किनाऱ्यावर आता युद्धाने पाय ठेवला होता.

युरुग्वेच्या अध्यक्षांच्या राजवाड्यात, फ्रेंच व ब्रिटिश वकिलातील व जर्मन प्रतिनिधींच्या बंगल्यावर खळबळ माजली होती. हालचाली वाढल्या होत्या. रेडिओ व केबल्सनी तर ही हकिकत केव्हाच सर्व जगात पसरविली होती. प्रत्येकाच्या ओठावर एकच प्रश्न होता – 'ग्राफ स्पीचे आता काय होणार?'

डॉ. ग्वानी हे युरुग्वेचे परराष्ट्रमंत्री. ते त्यांच्या ऑफिसातच बसलेले होते. त्यांच्याही मनात हाच प्रश्न होता – 'ग्राफ स्पीचे आता काय होणार?'

डॉ. ग्वानी दिसायला किरकोळ पण अतिशय हुषार होते. पहिल्या महायुद्धा-नंतर 'लीग ऑफ नेशन्स'ची स्थापना करण्यात त्यांनी खूपच मेहनत घेतली होती आणि तिचे अध्यक्षस्थानही भूषविले होते. अशी राजकीय कारकीर्द असलेले डॉ. ग्वानी युरुग्वेचे परराष्ट्रमंत्री होते. हीच गोष्ट युरुग्वेच्या दृष्टीने अत्यंत फायद्याची ठरली. 'ग्राफ स्पी'च्या अचानक आगमनाने तेही चक्रावून गेले होते. तेथे असलेल्या वेगवेगळ्या देशांच्या मंत्र्यांकडून व युरोपातील राजधान्यांतून केबल्स व निरोपांचा त्यांच्यावर भडिमार होत होता. लवकरात लवकर कृतीची मागणी केली जात होती. त्यांच्यावर दडपण वाढत होते.

सकाळचे ३–३० वाजले होते. तरीपण वेळेकडे दुर्लक्ष करून ग्वानींनी ग्राफ स्पीच्या भवितव्याशी निगडित असलेल्यांना आपल्या ऑफिसात बोलावले होते.

सर्वात प्रथम आला तो ग्राफ स्पीचा कप्तान हान्स लँग्सडॉर्फ. उंच नि सडपातळ शरीरयष्टीचा! – दिवसभरच्या लढाईचे मानचिन्ह म्हणून जखमी हात गळ्यात बांधून व गालावर पट्टी लावून आला होता. दिवसभरच्या थकव्याने व बिलकूल झोप न मिळाल्यामुळे त्याचे डोळे तारवटलेले होते. तरी पण त्यात करारीपणाची झाक होती व तेच डोळे डॉ. ग्वानींवर सरळ रोखलेले होते. कारण आता त्यांच्याच हातांत ग्राफ स्पीचे भवितव्य होते. कॅप्टन ओट्टो लँगमन हा जर्मन मंत्रीही होता.

प्रथम लँग्सडॉर्फने बोलायला सुरुवात केली. त्याने नौकेची झालेली हानी सांगितली. तसेच त्याने हेही सांगितले की तीसजण मृत्यू पावलेले आहेत व साठ जखमी नौकेवर आहेत. मग त्याने नौकेची दुरुस्ती होईपर्यंत बंदरात राहायला देण्याविषयी विनंती केली.

लँग्सडॉर्फ बोलत असताना डॉ. ग्वानी त्याच्या हाताकडे पाहत होते. त्या हातातील शौर्य त्यांना दिसत होते. त्याच्या चेहऱ्यावरील निर्भयता व करारीपणा त्यांना दिसत होता. त्याच्या डोळ्यातील आगटी त्यांना दिसत होती. पण त्याचबरोबर त्याच्या डोळ्यात जी चमक दिसत होती ती वर्णन करणेच शक्य नाही. – पण हे मात्र खरे होते, की ह्या शूर माणसाबाबत न घडणारे ते घडले होते व त्याचा त्यांच्यावर विश्वास बसत नव्हता. डॉ. ग्वानींना लँग्सडॉर्फबद्दल अनुकंपा वाटली. पण–!

सर्व ऐकल्यानंतर डॉ. ग्वानी गंभीरपणे जर्मन मंत्र्याला म्हणाले, "मी असे आश्वासन देतो की, तुमच्या सरकारच्या विनंतीचा काळजीपूर्वक विचार केला जाईल." मग ते लँग्सडॉर्फकडे वळून म्हणाले– "तुमच्या जहाजाची नासधूस किती झाली आहे, याची तपासणी करण्यासाठी काही तज्ज्ञांचे एक कमिशन तुमच्या जहाजावर येईल. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कक्षेतच तुम्हाला तुमच्या नौकेची दुरुस्ती करण्यासाठी योग्य तो समय दिला जाईल."

जाण्यासाठी उठल्यावर कॅ. लँग्सडॉर्फने नाविक सॅल्यूट ठोकला तर जर्मन मंत्र्याने नाझी सॅल्यूट करून 'हर हिटलर' म्हटले.

दुपारी ब्रिटिश मंत्री युजीन मिलिंग्टन ड्रेक डॉ. ग्वानींना भेटायला आले आणि आले ते आत्मविश्वासाने व कार्यसिद्धीच्या ध्येयानेच!

आल्यानंतर त्यांनी विचारले, "ग्राफ स्पीच्या बाबतीत तुम्ही काय ठरवलंय?– तुमच्या हक्कांची अंमलबजावणी तुम्हीं करणार असालच?"

पण डॉ. ग्वानींनी उत्तर द्यायच्या आधीच फ्रेंच मंत्र्याने हातात एक कागद घेऊन तावातावाने प्रवेश केला. तेव्हा कागद म्हणजे हेग कराराची प्रत होती! त्याने तो कागद डॉ. ग्वानींना दिला.

> 'तटस्थ राष्ट्रांना असा इशारा करण्यात येत आहे की युद्धखोर राष्ट्रांच्या युद्धनौकांना बंदरात येऊन नौकांची दुरुस्ती करू देऊ नये. कारण त्यामुळे त्यांची युद्धक्षमता वाढेल व...'

तो कागद डॉ. ग्वानींनी शांतपणे वाचला. मग ते म्हणाले, "हेग करार पाळला जाईल याची मी तुम्हांला खात्री देतो. पण जहाज प्रवासयोग्य करण्यासाठी जी दुरुस्ती करावी लागेल त्यासाठी परवानगी देणे भाग आहे!"

"पण फक्त तेवढीच दुरुस्ती करा असं ठामपणे सांगू शकाल का?" मिलिंग्टन ड्रेक म्हणाला.

"मीही तेच म्हणतोय!" फ्रेंच मंत्र्याने त्याची री ओढली. "काय शाश्वती देणार? आणि दुसरी गोष्ट अशी की ग्राफ स्पीच्या तोफा या क्षणी मॉन्टेव्हिडिओ-वर रोखलेल्या आहेत– शत्रूवर नाहीत!"

डॉ. ग्वानींचे डोळे क्षणभर चमकले. "सभ्य गृहस्थहो–!" ते संथपणे म्हणाले, पण त्यांच्या आवाजाला धार होती, "–माझा देश छोटा आहे–गरीब आहे! आम्ही फक्त दोन दशलक्ष लोक आहोत. आम्हाला थोड्याच गोष्टी समजतात–कायदा आणि न्याय आम्ही ओळखतो–धाक आणि दडपशाही नाही!"

हे धारदार शब्दच पुरेसे होते. आता जास्त बोलायची गरजच उरली नव्हती. अभिवादन करून ते दोघे मंत्री निघून गेले पण जाता जाता ग्राफ स्पीवर कडक नजर ठेवायची असा मनाशी निश्चय करून गेले होते.

रेक्स मिलर मॉन्टेव्हिडिओमधील आपल्या ऑफिसात खिडकीत बसला होता. त्याने बिलकुल वेळ दवडला नव्हता. खिडकीतून साऱ्या बंदराचा देखावा छान दिसत होता. 'मरीन टेलिस्कोप' घेऊन टेहळणी करण्यासाठी यापेक्षा छान जागा दुसरी कोणती होती!

रेक्स मिलर हा कॅप्टन जॉक मॅकॉलचा साहाय्यक होता. पण प्रत्यक्षात रेक्स मिलर हा दक्षिण अमेरिकेतील ब्रिटिश इन्टेलिजन्सचा प्रमुख अधिकारी होता. मिलर आणि मॅकॉल यांनी नंतरचे चार दिवस डोळ्यांत तेल घालून ग्राफ स्पीवर नजर ठेवली होती आणि तिच्यावर होणाऱ्या प्रत्येक हालचालीची बातमी आपल्या एम्बॅसीला दिली.

गुरुवारची सकाळ उजाडली! कॅप्टन लँग्सडॉर्फने कॅप्टन पॅट्रिक डोव्हला बोलावणे धाडले. डोव्ह हा ग्राफ स्पीवर असलेल्या २९ कैद्यांपैकी एक होता. गेले कित्येक महिने हे कैदी ग्राफ स्पीवर जर्मनांबरोबर खांद्याला खांदा लावून काम करीत होते. ह्या दरम्यानच्या काळात लँग्सडॉर्फकडून त्यांना मिळालेली वागणूक आणि आता ग्राफ स्पीचे भवितव्य कळल्यावर त्यांना लँग्सडॉर्फविषयी आदर वाटत होता. ह्याचे आणखीही एक कारण होते. लँग्सडॉर्फने जरी त्यांची जहाजे बुडवली होती पण त्याने संकटात सापडलेल्यांविषयी अमानुषता दाखविली नव्हती. तो संकटात सापडलेल्यांना व बुडणाऱ्यांना वाचविण्यासाठी शक्य असेल तेव्हा तातडीने धाव घेत असे.

लँग्सडॉर्फ नेहमीच्या पांढऱ्या गणवेषातच होता. शरीर थकलेले होते. झोपेविना डोळे तारवटलेले होते. तरी चेहऱ्यावर हसू होते. डोव्ह येताच कॅप्टन हसत पुढे झाला व त्याने डोव्हशी हस्तांदोलन केले.

"कसं काय, सर्व ठीक आहे ना?" त्याने हसून विचारले.

"सर्व ठीक आहे!" ज्या आत्मीयतेने प्रश्न विचारला होता त्याच आत्मीयतेने त्या इंग्लिश कॅप्टनने उत्तर दिले.

–नंतर नेहमीच्या शिळोप्याच्या गप्पा झाल्यावर त्यांचे संभाषण युद्धाकडे वळले.

" काय झालं ?–" डोव्हने सहज विचारले.

" काय होणार ?–ह्या धुमश्चक्रीत दोघंही प्राणपणाने लढले. विजयश्री कुणा-लाही माळ घालणे शक्य होती. ब्रिटिशांनी माझ्यावर सहा इंची तोफा डागल्या. त्या वेळी मी काही काळ चमकलो. मला वाटलं की एखाद्या मोठ्या युद्धनौकेचा आधार असल्याशिवाय ब्रिटिश असले धाडस करणार नाहीत आणि असा मारा करून मला ते त्या मोठ्या नौकेच्या तोंडी खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत. आणि......"

डोव्ह उत्सुकतेने ऐकत होता. पण लँग्सडॉर्फ एकदम शांत झाला.

" कॅप्टन, आता आपण काय करणार ? " काही क्षणानंतर डोव्हने विचारले.

" मी माझ्या नौकेची दुरुस्ती करू देण्यासाठी युरुग्वे सरकारला परवानगी मागितली आहे– " लँग्सडॉर्फ क्षणभर अडखळला. पण लगेच तो दृढतेने म्हणाला,– " आत्महत्या करण्यासाठी मी माझी माणसे घेऊन पुढे होणार नाही. "

–पण एकदम लँग्सडॉर्फला आठवले की आपण कुणाशी बोलत आहोत ते ! त्याने एकदम संभाषण आवरते घेतले आणि डोव्हशी पुन: हस्तांदोलन करून तो काहीही न बोलता आपल्या केबिनमध्ये निघून गेला.

पण नंतर मात्र लँग्सडॉर्फने आपल्या लोकांना चमत्कारिक हुकूम सोडले. ते थकलेभागलेले खलाशी दिवसभर नौकेची डागडुजी करीत होते. पडलेली भगदाडे ते कॅनव्हासने बुजवीत होते. इतर मोडतोड जुजबी दुरुस्त करीत होते. पण वरून मात्र रंग लावीत होते. ह्याचा अर्थ एकच होता की ते नौकेची झालेली हानी लपवीत होते. हा त्यांच्या प्रेस्टीजचा प्रश्न होता. जर्मनी एक सार्वभौम व विजेते राष्ट्र होते. म्हणूनच त्यांच्या एका अजिंक्य युद्धनौकेची दैना परकीयांपुढे प्रकट व्हायला त्यांना नको होती. युरुग्वे सरकारने नेमलेले कमिशन नौकेवर पाहणी करण्यासाठी येणार होते. हे सर्व बर्लिनहून येणाऱ्या हुकुमानुसार लँग्सडॉर्फ करीत होता. हिटलर व गोबेल्ससारखी महत्त्वाकांक्षेने पछाडलेली माणसे त्यांच्या प्रतिमेला लागलेला धक्का सहन करू शकत नव्हती.

–आणि आपल्या धन्याची आज्ञा पाळून लँग्सडॉर्फने स्वतःला एका विचित्र परिस्थितीत गुंतवून घेतले होते.

आंतरराष्ट्रीय नियमाप्रमाणे जर एखादी युद्धनौका दुरुस्तीसाठी दिलेल्या ठराविक वेळेपेक्षा जास्त काळ जर तटस्थ राष्ट्राच्या बंदरात उभी राहिली तर ते राष्ट्र ती नौका जप्त करू शकत होते. कसल्याही परिस्थितीत हे टाळण्यासाठी लँग्सडॉर्फपुढे एकच पर्याय होता तो म्हणजे आहे त्या स्थितीत नौका हाकारून नदीच्या मुखाशी उभ्या असलेल्या कमांडर हारवूडच्या नौकांना सामोरे जायचे !

पण त्याला अजून आशा वाटत होती की राईशविषयी डॉ. ग्वानींना व युरुग्वे सरकारला पूर्ण कल्पना होती. म्हणून ते संपूर्ण दुरुस्तीसाठी अजून काही वेळ देतील.

आता तेवढाच एक चान्स होता.

गुरुवारी रात्री ' कम्बरलँड ' हे क्रूझर अजॅक्स व अचिलेस यांना येऊन मिळाले.

इकडे लँग्सडॉर्फ व त्याचे खलाशी वेळेशी झुंज घेत होते. वेल्डिंगचा प्रकाश, हातोड्यांचे आघात, लोकांची धावपळ, कामाची धांदल. ग्राफ स्पीवर क्षणाची फुरसद नव्हती. लँग्सडॉर्फ काळाशी शर्यत खेळत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी मॉन्टेव्हिडिओवासी एक गंभीर, भव्य, पण शोकपूर्ण समारंभात सामील झाले. तो प्रसंगच तसा होता. ग्राफ स्पीवरच्या सर्वजणांनी आपआपली हत्यारे खाली ठेवली. कामे आवश्यक होती तरी ती सर्व थांबविण्यात आली. काही दिवसांपूर्वीच्या युद्धात कामी आलेल्या जर्मन वीरांना श्रद्धांजली अर्पिण्याचा व त्यांना माती देण्याचा तो प्रसंग होता. नाझी नाविक निशाणात गुंडाळलेल्या छत्तीस शवपेट्या लष्करी इतमामाने किनाऱ्यावर आणताना हजारो युरुग्वेवासीयांनी पाहिल्या. तेथे एक प्रकारची विचित्र शांतता पसरलेली होती. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या हजारो लोकांमधून त्या शवपेट्या ब्रिटिश स्मशानभूमीकडे जात होत्या. त्यांच्या मागे ग्राफ स्पीचे सैनिक व खलाशी कॅप्टन लँग्सडॉर्फसह मूकपणे चालले होते. पण अंतःकरण हेलावून सोडणारे दृश्य म्हणजे त्यांच्या मागोमाग ब्रिटिश व्यापारी जहाजावरचे अधिकारी व लोक कॅप्टन डोव्हच्या नेतृत्वाखाली मृत जर्मन सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चालले होते. लँग्सडॉर्फने त्यांना मुक्त केले होते.

स्मशानभूमीवर ते सारे एक होते. जर्मन–ब्रिटिश हा भेद तेथे नव्हता. कुणी कुणाचा शत्रू नव्हता. ते सर्व मानव होते. सारे एकमेकांचे भाऊ होते. ते एक अपूर्व असे पण मनाला चटका लावणारे दृश्य होते.

प्रार्थना संपल्यावर लँग्सडॉर्फ पुढे झाला व हळूहळू चालत त्याने प्रत्येक शवपेटीवर थोडी थोडी माती टाकली.

–जसा तो कॅप्टन डोव्हसमोर आला तसा तो एकदम ताठ उभा राहिला. त्याने डोव्हला अभिवादन केले व परत त्याच्याकडे न पाहता तो निघून गेला. डोव्हने लँग्सडॉर्फला पुनः पाहिलेच नाही.

सकाळी ७ वाजता लँग्सडॉर्फ व जर्मन मंत्र्याने धास्तावलेल्या मनःस्थितीत डॉ. ग्वानींच्या ऑफिसात प्रवेश केला.–डॉ. ग्वानींनी म्हणजेच युरुग्वे सरकारने कोणता निर्णय घेतला होता ?–

तसे पाहिले तर कमिशनचा रिपोर्ट ऐकल्यानंतर काही वेळातच ब्रिटिश व फ्रान्सकडून ग्राफ स्पीला बाहेर काढा म्हणून दडपण येत होते तर बर्लिनकडून तिला राहू द्या म्हणून !

डॉ. ग्वानी दोस्त राष्ट्रांच्या बाजूला झुकलेले आहेत हे सर्वश्रुत होते. तरी पण त्यांनी स्वतःच्या मनाचा ठाम निश्चय केला होता की सर्व आंतरराष्ट्रीय नियमांचे

ल्न करून शक्यतो नि:पक्षपातीपणाने वागेन !

ही बैठक फारच थोडया वेळात संपली. पण ती जर्मनांच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरली. कमिशनच्या रिपोर्टचे कागद चाळीत डॉ. ग्वानींनी लँग्सडॉर्फला विचारले, "ग्राफ स्पी दुरुस्त करण्यासाठी अजून किती वेळ लागेल ?"

सरळ उत्तर मिळण्यासाठी हा एकदम सरळ प्रश्न होता. लँग्सडॉर्फ प्रथम घुटमळला. मनाशी काही हिशेब करू लागला. त्याने उत्तर द्यावयाच्या आत जर्मन मंत्री म्हणाला, "कमीत कमी दोन आठवडे !"

"पण आमचे कमिशन सुचविते की अठ्ठेचाळीस तास पुरे आहेत !" डॉ. ग्वानी थंडपणे म्हणाले. हा सरळ टोला होता. लँग्सडॉर्फ ताडकन उत्तरला, "– महाशय, वरवरच नौकेने चौसष्ट ठिकाणी भयंकर मार खाल्लेला आहे !"

पण तितक्याच थंडपणे समोर पडलेल्या रिपोर्टकडे पाहत डॉ. ग्वानी म्हणाले, "पासष्ट–!"

दोघा जर्मनांनी एकदम चमकून एकमेकांकडे पाहिले. डॉ. ग्वानी त्यांना देण्यात येणारा हुकूम वाचू लागले–

'आंतरराष्ट्रीय करारातील आणीबाणीच्या परिस्थितीच्या कलमानुसार माझ्या सरकारला तुम्ही जी विनंती केली होती, ती मान्य करून माझे सरकार तुम्हाला तुमच्या नौकेची दुरुस्ती करण्यासाठी ७२ तासांची मुदत देत आहे. ती मुदत रविवारी, डिसेंबर १७ ला, संध्याकाळी आठ वाजता संपणार आहे–'

जर्मन मंत्री अवाक् झाला होता. त्याला बोलायला शब्दच सुचत नव्हते. चिमुकल्या युरुग्वेने त्याच्या जर्मन शक्तीवरच्या विश्वासाला धक्का दिला होता. त्याच्या वरच्या अधिकाऱ्यांना कल्पनाही येणार नाही अशा कठीण परिस्थितीच्या कात्रात तो सापडला होता. ह्या लहानशा माणसाने त्याच्या सामर्थ्याच्या कल्पनेला चक्काचूर केले होते–त्या लहान माणसाच्या शब्दामागे कायदा आणि लोकशाही स्वातंत्र्याचे महान् बळ उभे होते !

"माझा याला विरोध आहे !" शेवटी कसाबसा तो जर्मन मंत्री म्हणाला.

"तुमचा विरोध नोंदवून घेतला आहे." शांतपणे ग्वानी म्हणाले आणि चिटणीसाला बोलविण्यासाठी त्यांनी टेबलावरची घंटी वाजविली–मुलाखत संपली होती.

लँग्सडॉर्फ शेवटपर्यंत मान खाली घालून फक्त ऐकत होता ! –हा हुकूम म्हणजे त्याला मृत्यूची सजाच होती !

ग्राफ स्पीने जेव्हा मॉन्टेव्हिडिओचा आसरा घेतला तेव्हा तिला लवकरात लवकर बंदराबाहेर काढावे असे ब्रिटिशांचे धोरण होते. पण नंतर त्या धोरणात बदल झाला–कारण ती अजूनही युद्ध करण्याइतकी ठीक होती म्हणून तिला पळून जाण्याचा मौका न देण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले व त्या दिशेने त्यांनी हाल-

चालीस सुरुवात केली.

रेक्स मिलर काही स्वस्थ बसलेला नव्हता. त्याला कुठूनतरीं कळाले की ग्राफ स्पीच्या दुरुस्तीसाठी लागणारे पोलाद घेऊन एक जहाज ब्यूनॉस आयर्संहून मॉन्टेव्हिडिओकडे निघाले आहे. मोठमोठ्या अधिकाऱ्यांवर आपले वजन खर्च करून त्याने असा डाव टाकला की ग्राफ स्पीकडून किंवा ग्राफ स्पीकडे जाणाऱ्या–येणाऱ्या सर्वच जहाजांचा मार्ग त्याने बंद करून टाकला. त्यात ते पोलाद घेऊन जाणारे जहाजही आले.

मिलरची ही चाल सुरेख होती. पण फक्त शुक्रवार संध्याकाळपर्यंतच ! इकडे स्वतः लँग्सडॉर्फने डॉ. ग्वानीला विनंती करून ती बंदी उठविली.

दुसरी चाल चालायला पाहिजे होती. त्यासाठी मिलरने मॅकॉलचे साहाय्य घ्याव-याचे ठरविले. मॅकॉलला बंदरातील परिस्थितीची संपूर्ण कल्पना होती. तशात तो नुकताच हारवूडला भेटून आला होता.

"हारवड काळजीत आहे. त्याच्या दिमतीला तीन क्रूझर्स आहेत पण ती पुरेशी नाहीत. नदीचे मुख १६० कि. मी. रुंदीचे आहे आणि जर संधी मिळाली तर लँग्सडॉर्फ त्यांना गुंगारा देऊन खुल्या समुद्रात जाऊ शकेल ... मदतीसाठी नवीन जहाजे मंगळवारच्या आधी येण्याची हारवूडला बिलकूल आशा नाही."

मॅकॉल सांगत होता. मिलर ऐकत होता. तो एकदम म्हणाला, "मॅकॉल, तू मला एक चांगली कल्पना सुचविलीस !"

ग्राफ स्पीवर दुरुस्तीचे काम जोरात चाललेलें होते–

मिलरला माहीत होते की येथील वकिलात व ब्यूनॉस आयर्समधील एम्बॅसी यांच्यामधील टेलिफोन लाईन टॅप केलेली आहे. त्याचा फायदा घेण्याचे त्याने ठरविले.

मॅकॉलने ब्यूनॉसमधील त्याचे मुख्य सर एस्मंड ओव्हे यांना फोन केला.

"सर, मी मॅकॉल." मॅकॉल उत्सुकतेने म्हणाला, "सर, ग्राफ स्पीवर आणि-बाणीची स्थिती निर्माण झालेली आहे."

"खबरदार मॅकॉल !" सर ओव्हे दरडावून म्हणाले, "काही गुप्तता –!"

"मला माहीत आहे सर", मॅकॉल एकदम म्हणाला, "परिस्थितीच अशी आहे की जेथे गुप्ततेपेक्षा त्वरित कृतीची गरज आहे."

टेलिफोन लाईनवर काही क्षण शांतता पसरली. मिलर मॅकॉलकडे पाहून हसला.

"आपली दोन मोठी जहाजे भरवेगाने इकडे यायला निघाली आहेत." मॅकॉल घाईघाईने सांगू लागला. त्याच्या ह्या विधानावर सर ओव्हेंची काय प्रतिक्रिया होईल याची कल्पना करताना त्याला गंमत वाटली. "नौदलाच्या मुख्य कचेरीने असे सांगितले आहे की आज संध्याकाळपर्यंत त्यांच्यासाठी २००० टन तेलपाणी तयार ठेवा––जमेल ना तुम्हांला ?"

मॅकॉलने मिलरकडे पाहिले व तो पुन: बोलू लागला, "संदेश नीट समजला ना सर?...पुन: सांगू का?"

तावडतोब त्याला सर ओव्हेंचा आवाज ऐकू आला, "येस्स्–पुन: सांगा! —हळूहळू!"

—नंतर फोन बंद करीत मॅकॉल म्हणाला, "त्यांनी ओळखले!"

मिलरने भाकीत केले होते की, 'लवकरच वर्तमानपत्रवाले बोंब उठवतील' आणि अक्षरश: तसेच झाले. प्रत्येक वर्तमानपत्राच्या आवृत्तींमध्ये जाडजाड मथळ्यात छापलेले होते की ब्रिटिश नौदलाचे मोठे आरमार नदीच्या मुखाजवळ ग्राफस्पीची कोंडी करण्यासाठी जमा होत आहे– 'रिनाऊन' व 'रॉयल आर्क' ह्या दोन युद्धनौका हारवूडला येऊन मिळाल्याही.

—प्रत्येकाच्या जिभेवर एकच प्रश्न होता—'बाहेर निघायचे धाडस ग्राफस्पी करील का?'

जर तटस्थ मॉन्टेव्हिडिओतून एखादे ब्रिटिश जहाज बाहेर जाणार असेल तर आंतरराष्ट्रीय नियमानुसार नंतर चोवीस तास जर्मन युद्धनौकेला बंदरातून बाहेर पडता येणार नाही.

त्यानुसार मिलरला समाधान वाटण्याजोगी एक गोष्ट घडली. शुक्रवारी संध्याकाळ ६-१५ ला 'ॲशवर्थ' हे ब्रिटिश व्यापारी जहाज भर समुद्रात हाकारले गेले, चोवीस तासानंतर लगेच 'डन्स्टर ग्रेंज' हे दुसरे व्यापारी जहाज बाहेर पडले. म्हणजे रविवारी दिलेल्या वेळेनुसार ग्राफस्पीला दोन तास उशीराच बंदरातून बाहेर पडायला परवानगी मिळणार होती.

शनिवारी रात्री उशिराच पुन: एकदा लँग्सडॉर्फ जर्मन कचेरीत गेला. तेथे तो बहुतेक हिटलरशी शेवटचे बोलला असावा. आणि त्याला आखरी हुकूम मिळाला असावा. कारण लँग्सडॉर्फ जेव्हा ग्राफस्पीवर परतला तेव्हा तिच्यावर एकच गडबड उडाली. ग्राफस्पीवर नजर ठेवणाऱ्यांना तेथे बरीच खळबळ माजलेली व लोकांची धावपळ दिसत होती–पण त्याहीपेक्षा जास्त खळबळ कॅप्टन लँग्सडॉर्फच्या मनात माजलेली होती!

ग्राफस्पीवर का एवढी धावपळ चाललेली आहे हे कळायला मार्गच नव्हता. पण दुसरी त्याचे एक कारण उघड झाले. ग्राफस्पीवरचे बरेचसे लोक जवळच नांगरून पडलेल्या 'टाकोमा' या व्यापारी गलबतावर हलविण्यात आले. थोडेच लोक ग्राफस्पीवर राहिले.

रविवार उजाडला होता. मॉन्टेव्हिडिओवासीयांच्या मनावरचे दडपण दुपारपर्यंत वाढत होते. त्यांची उत्सुकता वाढत होती. लोकांच्या झुंडीच्या झुंडी किनाऱ्याकडे व धक्क्याकडे धावत होत्या. किनाऱ्याजवळच्या घरांच्या खिडक्या लोकांनी गच्च भरून गेल्या होत्या आणि ह्यात भर म्हणून ह्या प्रसंगाचे रेडिओवरून होणारे

घावते वर्णन ठिकठिकाणी लावलेले लाऊडस्पीकर मोठमोठ्याने ओरडत होते.

सायंकाळी ६-३० वाजता लहान बोटी व लॉन्चेस ग्राफ स्पीपासून दूर सरकताना दिसल्या. इंजिन सुरू केल्याचा आवाज आला. दोरखंडे सोडली गेली. नांगर उचलला गेला. धुराड्यातून धुराचा लोट बाहेर पडला. ग्राफस्पी हलली होती.

शहरातील सर्वांत उंच इमारतीच्या टॉवरमधून युजीन मिलिंग्टन-ड्रेक दुर्बिणीने हे सर्व पाहत होता. तसेच त्याला दूरवर तीन ठिपके दिसत होते. ते ठिपके म्हणजे ग्राफ स्पीची वाट पहात थांबलेल्या ब्रिटिशांच्या तीन युद्धनौका होत्या. त्याही हा नाट्यमय प्रसंग पहात होत्या. ह्या सर्वांपेक्षा मोक्याची जागा होती मिलरचे ऑफीस! तेथून सर्व स्पष्ट दिसत होते. मिलर व मॅकॉलही पाहत होते

ग्राफ स्पी हळूहळू पण डौलाने पुढे जात होती. तिच्या मागोमाग काही लॉन्चेस् व 'टाकोमा' हे जहाज जात होते, धडबड गोंगाट करणारे बघे लोक आता एकदम शांत झाले होते. पुढे घडणारा प्रसंग ते डोळ्यात प्राण आणून पाहत होते. काही अंतर गेल्यावर ग्राफ स्पी क्षितीजावर दिसणाऱ्या ब्रिटिश क्रुझर्सच्या दिशेला वळली.

—आणि एकदम जागच्या जागी थांबली. लाँचेस पुन: ग्राफस्पी जवळ गेल्या. आणि लोकांना दिसले की लोक भरून त्या लाँचेस 'टाकोमा'कडे गेल्या.

आता संध्याकाळचे सात वाजून चोपन्न मिनिटे झाली होती. सूर्यबिंबाने क्षितिजावर सागराला स्पर्श केला होता. सागरावर ही प्रचंड युद्धनौका शांतपणे पहुडली होती. सूर्य क्षितिजाआड झाला आणि त्याच क्षणी कानाचे पडदे फाडणारा भयंकर भयंकर आवाज झाला—स्फोटाचा! ग्राफ स्पीवर मग स्फोटांमागून स्फोट होऊ लागले. अग्नीच्या ज्वाला आकाशाकडे धाव घेऊ लागल्या. धुराचे लोट आसमंत व्यापून टाकू लागले.

काहीतरी लढाई होईल व ती पाहवयाला मिळेल या आशेने जमलेल्या लोकांच्या मुखातून ते स्फोट पाहून भीतीने किंकाळ्या फुटल्या. ते क्षणभर भीतीने गांगरून गेले. ग्राफस्पीवर स्फोटांमागून स्फोट होत होते. तिच्यावर असलेला संपूर्ण दारूगोळा फुटत होता. ग्राफ स्पी वरून मात्र, मागूनपुढून चहुबाजूंनी पेटली होती हळूहळू ज्वाला तिला ग्रासून टाकीत होत्या. थोड्याच वेळात ज्वालांच्या धगधगत्या कराल दाढेत ग्राफ स्पी गुरफटली गेली

अजॅक्सवर सारेजण स्तब्ध झाले होते. कुणाच्याही तोंडून शब्द फुटत नव्हता. हारवूड पांढराफटक पडला होता. तो दोन्ही हातांनी तोंड झाकून बसला होता. शहरातील सर्वांत उंच टॉवरवर बसलेल्या मिलिंग्टन-ड्रेकने घड्याळाकडे पाहिले,— सूर्य मावळला होता! —'क्षणाचाही फरक नाही! —हा परमेश्वराचा संधिप्रकाश आहे!—'

हळूहळू अंधार पसरत होता. त्या अंधाराच्या पार्श्वभूमीवर ही जळणारी ग्राफ

स्पी भयानक दिसत होती. प्रत्येक स्फोटाबरोबर ती खिळखिळी होत होती. धातूचे तप्त तुकडे व लाकडाचे जळके तुकडे उंच उडत होते आणि उकळत्या सागरात पडत होते. तिच्या डेकचा पुरा चुराडा झाला होता. हळूहळू एका बाजूला कलंडून ती पाण्यात बुडत होती. – तरी अजून तीन दिवस ती अशीच जळणार होती !

ह्या ठिकाणी ह्या नाटकाचा दुसरा अंक क्लायमॅक्स साधून संपला होता आणि तिसरा अंक घडणार होता. तो शेवटचा अंक ब्युनॉस आयर्समध्ये घडला.

अर्जेंटीन सरकार मित्रत्वाने वागले. ग्राफ स्पीच्या लोकांची चांगली काळजी घेऊ अशी कबुली त्यांनी दिल्यावरच लँग्सडॉर्फचा जीव भांड्यात पडला. त्याच्या मनावरचे ओझे उतरले.


– मग २० डिसेंबरला सकाळी कॅप्टन लँग्सडॉर्फने सार्वभौम राष्ट्रीय जर्मन नाविक निशाणात स्वतःला गुंडाळून घेतले व डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली.

हे त्याचे शेवटचे कृत्य म्हणजे नाझी ध्वजाऐवजी जुन्या राष्ट्रीय निशाणांचा उपयोग करणे हे नाझी अधिकाऱ्यांचा व जर्मन हुकूमशाहीचा धिक्कार करण्यास पुरेसे होते.

ग्राफ स्पीचा आत्मघात करण्यास देण्यात आलेले हुकूम किंवा आज्ञा लँग्सडॉर्फला कुणी दिल्या – किंवा हा निर्णय कुणी घेतला हे बहुतेक अज्ञातच राहील ! त्यातील सत्य केव्हाच प्रकट होणार नाही. ते कुणालाही कळणार नाही.

– पण हे मात्र खरे आहे ! – सत्य आहे की स्वतःची खोटी प्रतिष्ठा राखण्यासाठी जर्मन राईशच्या काही राजकारणी लोकांनी एका निष्ठावान, विश्वासू व शूर सैनिकाचा निष्कारण बळी घेतला – आणि ग्राफ स्पीसारख्या बलाढ्य युद्धनौकेचा अपमानास्पद नाश – पराभव केला.

[ Michael Powell च्या ‘ Last Voyage of Graf Spee ’ वर आधारित ]



# सुसान बी. अँथनी

—नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुसंख्य स्त्रियांनी ऐटीत जाऊन आपले मत दिले असेल, तर काहींनी 'काय करायचा तो मेला उन्हाचा त्रास' असं म्हणून मत द्यायचं टाळलंही असेल. पण स्त्रियांनी मत देणं हा आपण सहजगत्या गृहीत धरत असलेला अधिकार अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशातही केवळ ५० वर्षांपूर्वीपासून स्त्रियांना देण्यात आला आणि त्याकरता त्यांना कित्येक वर्षे जबर झगडा करावा लागला हे फारसे कोणाला ठाऊक नसेल.

या हक्काकरता झगडणाऱ्या
एका अमेरिकन महिलेची ही कहाणी—

**शिरीष पटवा**

अमेरिकेच्या न्यूयॉर्क बंदरात स्वातंत्र्य देवीचा पुतळा आहे. परंतु दैवदुर्विलास असा की गुलामगिरी नष्ट करण्याचे, लोकशाहीचे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे धडे साऱ्या जगाला शिकवणाऱ्या या अमेरिकेतील देवींना (महिलांना) स्वातंत्र्य असे कसलेच नव्हते. हा पुतळा उभारल्यानंतरही कित्येक वर्षे अमेरिकन स्त्रियांना स्वतःचे नावावर घरदार वा जमिन घेणे, उद्योगधंदा चालवणे, वारसाहक्काने पैसे मिळणे, करारावर सही करणे याला बंदी होती. फार काय स्वतःच्या मुलांची कायदेशीर पालक म्हणूनही कायद्याने स्त्रीला मान्यता नसे. मग मतदानाचा हक्क तर लांबच राहिला !

सुसान अँथनीचा जन्म १८२० मध्ये झाला. त्याकाळी मुलींना एखाद्या नाजूक फुलासारखं वाढवलं जाई. त्यांनी लाजाळू आणि आदबशीर वागलंच पाहिजे असा संकेत होता. पळणं, उड्या मारणं, सायकलवर बसणं या गोष्टी 'मुलीच्या जातीला' शोभणाऱ्या नसत. नव्हे त्या करणं अशक्यच होईल अशी त्याकाळची स्त्रियांची

वेशभूषा असे. चालू फॅशनप्रमाणे शरीराला आकार देणारे घट्ट आवळ पट्टे, त्यावर एक आच्छादन, मग एक लांब झगा, त्यावर ५–६ जाडजूड, कडक असे परकर आणि या सर्वांवर उंच मानेचा, लांब बाह्यांचा घट्ट कोठयाच्या आणि फुगदार घोळांचा एक फ्रॉक असे. त्याकाळच्या आयुष्याचं एकमेव ध्येय असे विवाह. चूल आणि मूल हेच तिचं विश्व. त्याकरता उच्च शिक्षण लागत नसे, त्यामुळं त्यांना कुणीही ते देत नसत. स्वयंपाक, शिवणकाम, दूध दुभत्याचं पहाणं, सूत काढणं आणि कापड विणणं एवढं शिकलं की बस् !

अविवाहित रहाणाऱ्या स्त्रियांची कीव केली जाई किंवा टर उडवली जाई. समाजात प्रतिष्ठा आणि जीवनात आधार प्राप्त करून देणारा नवरा न करता एखादी बाई आपण होऊन एकटी रहाणं पसंत करीत असेल हे कुणाला खरंच वाटत नसे। स्त्रिया त्याकाळी नागरिक नव्हत्याच, रयत होत्या. एखाद्या स्त्रीला काम करावं लागलंच तर तिचा मेहेनताना परस्पर तिच्या नवऱ्याकडे सुपूर्द केला जाई. निसर्गतःच स्त्रियांना हीन लेखण्यात येई. साहजिकच गुलाम, वेडे आणि गुन्हेगार यांचेप्रमाणेच स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार नव्हता.

सुसानचे वडील डॅनीएल अँथनी हे क्वेकर पंथाचे होते. मॅसॅचुसेट्समध्ये त्यांचं एक मोठं दुकान आणि कापसाची गिरणी होती. डॅनीएल हे उदारमतवादी आणि स्वतःच्या बुद्धीला पटेल त्या गोष्टी लोकमताची फारशी तमा न बाळगता करणारे होते. क्वेकर पंथीय नसणाऱ्या आपल्या बालपणीच्या मैत्रिणीशी विवाह करून त्यांनी लोकांना धक्का दिला होता. हिवाळयात रंगीबेरंगी लोकरीचे कपडे चढवून 'साधी वेशभूषा' हा क्वेकर पंथाचा नियम ते गुंडाळून ठेवीत असत. आपल्या मुलांना आणि मुलींना ते सारख्याच दर्जाचे समजून वागवीत आणि शिक्षण देत. एकदा तर त्यांनी सुसानला सुट्टीत आपल्या गिरणीत काम दिले होते आणि इतर कामगारांइतकाच पगारही तिला लगेच दिला होता. एकदा सुसानने सहज सुचवले "त्या एलिजाऐवजी तुम्ही सॅली ॲनला मुकादम करा. ती किती तरी चांगलं काम करेल." पण उदारमतवादी डॅनीएलनासुद्धा ही सुधारणा अंमलात आणण्याचे धाडस झाले नाही. 'मुकादम' सारखी उच्च अधिकाराची जागा एका स्त्रीला देणे म्हणजे भलतंच काही तरी होतं !

सुसानचे वडील लवकरच न्यूयॉर्क राज्यात उद्यमिक झाले आणि बॅटनव्हिले गावातल्या छोटया शाळेत सुसानचे शिक्षण सुरू झालं. लिहिणं वाचणं आणि बेरीज वजाबाकी अल्पावधीतच शिकल्यावर सुसानने मास्तरांचेकडे गुणाकार भागाकार शिकवण्याची मागणी केली. मास्तरनी अर्थात नकार दिला. कदाचित त्यांनाही या गोष्टी कशा शिकवतात ते ठाऊक नसावं, पण मुख्य म्हणजे 'मुलीच्या जातीला' या भलत्याच गोष्टी शिकायला हव्यातच कशाला, असं त्यांचं मत होतं.

अँथनी यांना हे समजताच त्यांनी स्वतःच्या घरीच एक आदर्श शाळा सुरू केली.

आसपासच्या मुलांना बोलावून त्यांनी एका धर्मकेंद्रात शिक्षण घेतलेल्या शिक्षकेची तिथं नेमणूक केली. शाळेतलं शिक्षण जरा नवीन प्रकारचं होतं. घरकामाबरोबरच मुलींना गणित, कविता हेही विषय शिकवण्यात येत. इतकंच काय खास मुलांच्या करता लिहिलेली पुस्तक त्यांना देण्यात येत.

मुलांचे प्रमाणेच मुलींनाही आपल्या पायावर उभं राहता आलं पाहिजे. असं श्री. अँथनी यांचं मत होतं. त्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मोठ्या मुलींना शिक्षिका केलं. (कारण स्त्रियांनी करण्याजोगा हा एकच सन्मान्य व्यवसाय त्या काळी होता) सुसानलाही त्यांनी सतराव्या वर्षीच मिस मुल्सनच्या 'बोर्डिंगात' ठेवली. मुल्सन बाईंच्या शाळेतली शिक्षा फार कडक होती. घरी पाठवण्याच्या पत्रातील मजकुराबद्दलसुद्धा कडक नियम असत. साध्यासुद्धा चुकांबद्दल त्या मुलींना फाडून खात.

दुर्दैवाने याच वेळी अँथनींना धंद्यात फार मोठा फटका बसला. घर, त्यातलं सामानसुमान, भांडी, इतकंच काय चष्मे, मुलांची पुस्तके, कपडे, चहा, साखर हेही हेही विकाव लागलं. शाळेत जाण्याची आशा सुसाननं सोडूनच दिली. अँथनी कुटुंब हार्डस्कॅबल या लहान गावात येऊन राहिलं आणि सुसान घरकामाच्या रगाड्यात अडकली. तिच्या थोरल्या बहिणीचे लग्न झालं. सुसानलाही बऱ्याच मागण्या आल्या पण तिनं सर्वांना नकार दिला.

१८३९ मध्ये तिनं शिक्षिका म्हणून कामाला सुरुवात केली. अत्यंत काटकसरीने राहून ती घरी पैसे पाठवीत असे. काही वर्षांनी वडिलांची परिस्थिती पुन्हा सावरल्यावर तिनं तरतऱ्हेच्या फॅशनेबल कपड्यांची आपली हौस पुरवून घेतली.

सुट्टीत घरी वडलांचेकडे आल्यावर तिथे चालणाऱ्या लोकाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रश्नावरील चर्चेमध्ये तिला फार गोडी वाटू लागली. सामाजिक अन्याय दूर करण्याकरता आणि समाजाच्या उन्नतीकरिता आपणहीं काही करावं असं सुसानला वाटू लागलं. विशेषतः गुलामीविरुद्ध लढा आणि दारूबंदीची चळवळ यात तिनं सक्रीय भाग घेण्यास सुरुवात केली. या प्रश्नावरील सभांना आणि परिषदांना ती हजर राहू लागली. 'नशाबंदी कन्या' (Daughters of Tempecnee) या संस्थेत ती दाखल झाली. आपल्या सारख्याच विचारांच्या अनेक स्त्रियांशी तिची मैत्री जमली. वडिलांच्या पूर्ण पाठिंब्याने तिने या कार्यास वाहून घेण्याचे ठरवले.

१८५२ मध्ये पहिली स्त्री हक्क परिषद भरली होती. श्रोत्यांमध्ये अर्थातच बहुसंख्य स्त्रिया होत्या. एका पाठोपाठ एक वक्त्या विचारत होत्या 'स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार का नसावा? त्यांना उच्च शिक्षण का नाकारलं जावं? कायद्यापुढे स्त्री-पुरुष समान का लेखले जाऊ नयेत?' भाषण स्वातंत्र्य आणि मतदानाचा हक्क मिळालाच पाहिजे अशी परिषदेची मागणी होती. श्रोत्या टाळ्यावर टाळ्या देत होत्या.

काही वृत्तपत्रांची या परिषदेला सहानुभूती होती तर काहींनीं 'मूर्खांचा बाजार' असे याचे वर्णन केले. नेहमीप्रमाणेच कुठल्याही सामाजिक सुधारणेला विरोध करणारे धर्ममार्तंड या परिषदेविरुद्ध खवळून उठले. साऱ्या देशभरच्या चर्चेसमधून 'घर संसार सोडून भर सभेत येऊन भाषणबाजी करणाऱ्या' या विनयशून्य स्त्रियांच्या विरुद्ध कडाक्याची टीका होऊ लागली. 'या स्त्रियांना उत्तेजन देणारे पुरुष स्त्रियांचे खरे पाठीराखे नव्हेतच. उच्च पदस्थ स्त्रीत्वाला मातीत मिळवून पायदळी तुडवणारे हे सैतान आहेत.' चर्चमध्ये हजर असणाऱ्या बहुतेक स्त्रिया या विचारांशी सहमत असत. आपल्याकडील कथेकरीबुवा 'सुधारक' स्त्रियांची रेवडी उडवू लागताच देवळातल्या रमाकाकू-ठमाकाकू कशा खूष होत, त्यातलाच प्रकार.

पण सुधारक मनाच्या महिलांना ही 'उच्च पदे'च नकोशी झाली होती. सर्व-सामान्य जनतेत मिसळून सुखाचे, आरामाचे आयुष्य त्यांना हवे होते. स्त्रियांचे अतिशय गैरसोयीचे कपडे हेसुद्धा त्यांच्यावर लादलेले एक बंधनच आहे अशी त्यांची खात्री होती. खुद्द कपड्यांपासूनच सुधारणेला सुरुवात करायचे त्यांनी ठरवले. सुसानने नाखुषीनेच आपले फॅशनेबल कपडे दूर ठेवले आणि नवीन सोयी-स्कर, साधे, सुटसुटीत, म्हणजेच 'सुधारक' कपडे चढवले. घोट्याशी टाचलेली सैल विजार आणि साधा अंगरखा असा आपल्याकडच्या 'सलवार-खमीस'सारखा हा पोषाख होता. हा नवा 'अमेरिकन पोषाख' वापरण्याचे आवाहन अमेलिया ब्लूमर या बाईंनी आपल्या मासिकातून स्त्रियांना केलं.

फारच थोड्या स्त्रियांना ही सुधारणा अंमलात आणण्याचे धाडस करवले. सबंध देशभर या 'भयंकर पोषाखा'विरुद्ध प्रचंड वादळ उठले. असा पोषाख करणाऱ्या बाईच्या मागे मुले ओरडत आणि दगड मारत फिरू लागली. इतर स्त्रिया तिची हेटाळणी करू लागल्या आणि घरचे लोकही अशा पोषाखात तिला बाहेर नेण्याचे अमान्य करू लागले. अशा आपत्तींना तोंड देत केवळ तत्त्वाखातर सुसानने हा पोषाख वापरणे चालू ठेवले.

१८५३ मध्ये सुसान एका शिक्षक-संमेलनाला गेली होती. दोन दिवसपर्यंत बोलणारा प्रत्येक वक्ता शिक्षकीपेशाला समाजामध्ये डॉक्टर, वकील वा धर्मोपदेशक यांच्यासारखा मान मिळत नाही ही तक्रार मांडत होता. या संमेलनाच्या प्रतिनिधीं-पैकी २/३ स्त्रिया होत्या. पण स्त्रिया असल्यामुळे त्यांना जाहीर भाषण करण्यास वा मत देण्यास मज्जाव होता. अखेर सुसानला राहवले नाही. ती उठून म्हणाली, 'अध्यक्ष महाशय—'

सारी सभा चूप झाली. प्रत्येकजण मान वळवून ही ढालगज भवानी आहे तरी कोण हे पाहू लागला. पाहतात तो काय, एक ३३ वर्षांची, काटकोळी—ब्लूमर पोषाखवाली!

'बाईंना काही हवं आहे' अध्यक्षांनी विचारले.

धडधडत्या हृदयाने आणि कापऱ्या पायांनी सुसानने सुरुवात केली. 'आपण ज्या बाबत तक्रार करीत आहात त्या अनादराचं कारणच तुमच्या लक्षात आलेलं नाही असं मला वाटत. जोपर्यंत समाजाची अशी समजूत आहे की डॉक्टर, वकील अथवा धर्माधिकारी होण्याइतकी बुद्धिमत्ता स्त्रियांच्यामध्ये नसते, पण शिक्षक होण्याइतपत मात्र असते, तोपर्यंत शिक्षकाचं काम स्वीकारणारा प्रत्येक मनुष्य आपल्याला स्त्रियांच्या इतपतच बुद्धी आहे हे एकपरीनं कबूल' करतो.' सुसान खाली बसली. शेजारची एक शिक्षिका आपल्या शेजारणीला मोठ्याने म्हणाली, 'आगाऊ कुठली!' आणि तिच्या ब्लूमर पँटचा विटाळ होऊ नये म्हणून की काय, आपल्या स्कर्टचा घोळ सावरीत लांब सरकली.

स्त्रीहक्कासाठी द्यावा लागणारा लढा किती कष्टाचा आणि दीर्घ मुदतीचा असणार आहे याची सुसानला कल्पना आली. सर्वांत महत्त्वाचा हक्क होता मतदानाचा. हा स्त्रियांना मिळाला की इतर सुधारणा आपोआप झाल्या असत्या.

त्याचप्रमाणे ब्लूमर पोषाखाचे वैयर्थही सुसानला लवकरच उमगले. अशा पोषाखात श्रोत्यांचे लक्ष वक्त्याच्या विचारापेक्षा त्याच्या कपड्यांवरच खिळून राहते हे तिच्या लक्षात आले. एका वेळी एकच लढा पार पाडायचा तिने ठरवले.

तिने नोकरी सोडली, ब्लूमर पोषाखही टाकून दिला आणि उरलेले सर्व आयुष्यभर स्त्रियांच्या हक्कासाठी लढा देण्यात तन, मन, धन वेचले. न्यूयार्क राज्यातच तिने आपल्या मोहिमेला सुरुवात केली. गावोगाव जाऊन व्याख्याने द्यायची, भाषणाच्या प्रती, पुस्तके विकायची, मतदानहक्काच्या अर्जावर सह्या गोळा करायच्या. असा तिचा कार्यक्रम सुरू झाला. न्यूयॉर्क विधानसभेच्या पुढील अधिवेशनात हा अर्ज दाखल करण्याचा आणि स्त्रियांना मालमत्तेचा हक्क देणारा कायदा करण्याची विनंती करण्याचा तिचा विचार होता.

२० मे १८५४ रोजी मेव्हिले गावातल्या चावडीवर सुसान अँथनीने आपल्या मोहिमेला प्रारंभ केला. सभेच्या जागी लावण्याकरता मेणबत्त्या तिने स्वतःच आणल्या होत्या. पुढे इतर गावातून तिने सार्वजनिक सभागृहातून आणि चर्चेसमधूनही व्याख्याने दिली. पण पुष्कळदा अशा जागी तिची सभा भरवायला अधिकारी मडळी परवानगी नाकारत असत. मग कोणातरी न्यायप्रिय गृहस्थांचे घरी अथवा एखाद्या हॉटेलच्या जेवणघरात तिची सभा होत असे.

हा दौरा काही सुखाचा नव्हता. हिवाळा कडक होता. अनेक गावांना बर्फावरच्या घसरगाडीतून जावे लागे. त्या काळच्या खानावळीत आधुनिक सुखसोयी कुठल्याच नव्हत्या. पुष्कळदा अँथनीबाईंना उशाशी ठेवलेल्या भांड्यातील पाण्यावरचे बर्फ फोडून खालच्या पाण्याने तोंड धुवावे लागे.

यापूर्वी बहुसंख्य लोकांनी सार्वजनिक जागी उभे राहून व्याख्यान देणारी बाई बघितलीच नव्हती. त्यामुळे काहींनी तिच्यावर उगाच स्वतःचे प्रदर्शन केल्याचा

आरोप केली. काहींनी आमचे सुखी संसार उद्ध्वस्त करण्याचा या कैदाशिणीचा प्रयत्न आहे असे म्हटले. काहींनी हुल्लडबाजी करून तिच्या सभा मोडण्याचा प्रयत्न केला. काही दारुड्यांनी तिला बंदूक उगारून धमक्या दिल्या. तिच्या प्रेतयात्रा निघाल्या, धर्मगुरूंनी तिला एक धोकेबाज चक्रम ठरवली. वर्तमानपत्रांनी पुरुषी कपड्यांतली लठ्ठ विरूट ओढणारी अशी तिची व्यंगचित्रे काढून तिची टर उडवली. काही थोड्या लोकांनी मात्र तिचे विचार शांतपणे ऐकून घेतले आणि आपल्या बायका, मुलींच्यासह तिला मदत करण्याची तयारी दर्शवली. पाच महिन्यांत अँथनीबाईंनी ५४ परगण्यांचा दौरा करून आपल्या व्याख्यानाच्या २०,००० प्रती खपवल्या. पण आणखी सह्या गोळा करायला हव्या होत्या.

१८५६ च्या जानेवारीत अँथनीबाईंचा दौरा पुन्हा सुरू झाला. आपल्या प्रवासात स्त्रियांच्यावर होणाऱ्या लहान-मोठ्या अन्यायांची अनेक उदाहरणे त्यांना पाहायला मिळत. आईला लिहिलेल्या एका पत्रात त्या लिहितात–

'...आम्ही उतरलो आहोत त्या खानावळीची मालकीण पुरी २० वर्षांचीही नाहीय् आणि तिला १½ वर्षांचं एक मूल आहे...आम्ही पोचल्यावर तिने पहिली सगळी भांडी घासलीन, रडणाऱ्या मुलाला झोपवलं आणि त्यापुढे आमचा सैपाक केलान...आम्हांला दिलेल्या खोलीत तिच्या विणकामाचे आणि भरतकामाचे नमुने जागोजागी झळकत होते...दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता आमच्या न्याहरीची उत्तम व्यवस्था तिने स्वतः ठेवली होती...आणि ज्याकरता हे सगळं रामायण सांगितलं ते हे की आम्ही बिल चुकते केले त्यावेळी तिचा ऐदी नवरा पुढे आला आणि त्याने स्वतःच्या खिशात सगळे पैसे ठेवून दिले. आपल्या पत्नीला पडत्याने थोडाही हातभार न लावता सारा वेळ बारमधल्या मित्रांशी गप्पा मारण्यात घालवला होता, मुलाला सांभाळणे तर लांबच! असे असूनही त्या स्त्रीच्या कष्टाच्या पैन पैवर या राजेश्रींचा कायदेशीर अधिकार! आणि तिला एक पैशाची सुई आणायची असली तरी या साहेबांच्याजवळ पैसे मागायला पाहिजेत आणि ते का पाहिजेत त्यांचा खुलासा करायला पाहिजे.' (आपल्याकडे अशी उदाहरणे अद्यापिही आढळतात.)

दोन वर्षं प्रयत्न करून जमा केलेल्या १०,००० स्वाक्षऱ्यांनिशी आपला ठराव अँथनीबाईंनी फेब्रुवारीमध्ये विधानसभेला सादर केला. त्यातील सदस्यांच्यावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. एक सदस्य उद्गारले – 'या असल्या विपर्यस्त, निर्लज्ज आणि बेकायदेशीर मागण्यांना आपण थोडीसुद्धा किंमत देता कामा नये. 'पुरुष आणि स्त्रिया समान असतात' या नालस्तीवर आपण कायद्याचे शिक्कामोर्तब करणार काय? परमेश्वराने पुरुषालाच मानवजातीचा प्रमुख म्हणून निवडले आहे हे आपण जाणतो.'

एका समितीवर या अर्जाचा विचार करण्याचे काम सोपवण्यात आले. त्यांनी

आपला अहवाल सादर केला. त्यावेळी हशा आणि टाळ्यांचा कल्लोळ उडाला. समितीचे अध्यक्ष म्हणाले, 'स्त्रियांना जेवणाच्या टेबलावर उत्तम जागा आणि पदार्थ दिले जातात. गाडीमध्ये त्यांना सर्वांत आरामशीर जागा देण्यात येते...उन्हाळ्यात थंड आणि हिवाळ्यात उबदार...स्त्रियांच्या पोषाखाला पुरुषांच्यापेक्षा तिप्पट खर्च येतो...आणि सध्याच्या फॅशननुसार एक बाई पुरुषाच्या तिप्पट जागा सर्वत्र अडवत असते. त्यामुळे आम्हांला असं आढळतं की काही विषमता वा अन्याय होत असेल तर तो पुरुषांचेवरच होत आहे.'

अँथनीबाईंच्या हितचिंतकांनी त्यांना आपली मोहीम थांबवण्याचा सल्ला दिला. 'आता जरा विश्रांती घ्या. एका दिवसात वा एका वर्षात अशा सुधारणा घडून येणं अशक्य आहे' असं त्यांचं म्हणणं होतं. पण अँथनींनी माघार घेतली नाही. या सर्व गदारोळाची त्यांना कल्पना होती. पण यातूनच पुढे यश मिळेल अशी त्यांची खात्री होती. 'स्वतःच्या इभ्रतीला जपणारे भेदरट लोक कसलीच सुधारणा करू शकणार नाहीत' असे त्या सांगत. सुधारणेच्या नवनवीन कल्पना लोकांचेपुढे मोठ्या धाडसाने मांडून त्यांनी सर्व समाजाला जबरदस्त धक्के दिले. न्यूयॉर्क राज्याच्या शिक्षक संमेलनात 'मुला-मुलींना एकत्र शिक्षण देण्याची आवश्यकता' हा विषय त्यांनी उत्कृष्टपणे सादर केला. आणखी एका व्याख्यानात त्यांनी 'स्त्रीनं आपलं सारं आयुष्य नवऱ्याच्या मर्जीप्रमाणे वागण्यात खर्च न करता स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचा प्रयत्न करावा. एवढंच काय, दुर्दैवाने संसारात सुख लाभत नसल्यास स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार असावा,' हा क्रांतिकारक विचार मांडला.

अमेरिकेतील यादवी युद्ध संपल्यावर मुक्त झालेल्या निग्रोंप्रमाणेच स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार दिला जाईल असं पुष्कळांना वाटत होतं. परंतु १८६८ मध्ये संमत झालेल्या १४ व्या घटनादुरुस्ती विधेयकात स्त्रियांचा कुठे उल्लेखही नव्हता. या विधेयकानंतरसुद्धा अनेक दक्षिणेकडील राज्ये निग्रोंना मतदानाचा हक्क देत नसत. ह्याकरता घटना दुरुस्तीचे आणखी एक विधेयक संमत करून घ्यावे लागले. यावेळी तरी आपली वर्णी लागेल अशी स्त्री–सुधारणावाद्यांची कल्पना होती. १८७० मध्ये घटनेची पंधरावी दुरुस्ती अंमलात आली. त्यामध्ये 'कोणाही अमेरिकन नागरिकाचा मतदानाचा हक्क वंश, वर्ण वा पूर्वीची दास्यस्थिती या कारणांस्तव नाकारला जाणार नाही.' एवढाच उल्लेख होता. लिंगभेदाखातर हा हक्क नाकारला जाणार नाही असा उल्लेख नव्हता.

अँथनीबाईंनी ठरवलं आता सरळ सरळ हल्ला करण्याची वेळ आली आहे. १ नोव्हेंबर १८७२ रोजी त्या आपल्या तिघी बहिणींसह एका मतदार नोंदणी केंद्रावर गेल्या. तिथल्या अधिकाऱ्याला त्यांनी सांगितलं, 'आम्ही आमची नावं मतदार यादीत नोंदवण्याकरता आलो आहोत.' 'भलतंच' साहेब उद्गारले.

'कायद्याप्रमाणे स्त्रियांना मतदान करता येत नाही. सबब तुमची नावं नोंदवून घेता येणार नाहीत.' लगेच अँथनीबाईंनी आपल्या पिशवीतून संयुक्त संस्थानांच्या घटनेची प्रत काढली. सगळे अधिकारी भोवती गोळा झाले. १४ वी व १५ वी दुरुस्ती वाचून दाखवून त्यांनी त्यात 'स्त्रियांची नावे नोंदवू नयेत,' असा खास उल्लेख दाखवण्याचे आव्हान दिले. अधिकारी बुचकळ्यात पडले. अखेर कां कूं करत त्यांनी चौघींचीही नावे नोंदवून घेतली. एक चकमक यशस्वी पार पडली. लगेच त्यांनी गावात हिंडून आणखी बारा स्त्रिया नाव नोंदवण्यास तयार करून आणल्या. थोड्या वेळात आणखी चौतीस. त्याचबरोबर वीसएक वकिलांशी त्यांनी या मुद्याची चर्चा केली. अखेर एक वकील त्यांची बाजू लढवण्यास तयार झाले.

निवडणुकीचा दिवस उजाडला. आता खरी कसोटी होती. स्वतः सुसान अँथनी, त्यांच्या तीन बहिणी आणि नावे नोंदवणाऱ्यांपैकी इतर ११ स्त्रियांनी प्रत्यक्ष मतदान करण्याचे धाडस केले.

त्यांच्या या कृत्याचा वृत्तपत्रांनी मोठमोठे मथळे देऊन गवगवा केला. काही वृत्तपत्रे त्यांना पाठिंबा देणारी होती, पण बहुतांशी विरोधीच होती. या अगाऊ स्त्रियांना आणि त्यांच्या पुढारीणबाईंना कडक शासन करावे असे अग्रलेख सर्वत्र येऊ लागले. अशा बेकायदेशीर वर्तणूक करणाऱ्या प्राण्यांना मतदानाचा अधिकार नसलेलाच बरा, असे एकाने लिहिले. या स्त्रियांना अटक करून त्यांच्यावर खटला भरला जावा, नाहीतर कुणीही साळकाया माळकाया उठतील आणि राजरोसपणे नावे नोंदवून चक्क मतदान करतील! असा सर्वत्र हलकल्लोळ उडाला.

आता सरकारला कृती करणं भागच होत. काहीतरी सोक्षमोक्ष लावायलाच हवा होता. १८ नोव्हेंबर रोजी केंद्र सरकारचे एक अधिकारी इ. जे. कीने अँथनीबाईंच्या घराची घंटी वाजवून म्हणाले, 'मिस अँथनी, तुमच्या अटकेचा हुकूम बजावण्यास मी आलो आहे.' हात पुढे करून अँथनीबाई म्हणाल्या, 'घाला बेड्या.' पण तिकडे दुर्लक्ष करून कीने महाशयांनी त्यांना चालवतच कोपऱ्यापर्यंत नेले आणि घोड्याची ट्रॅम पकडून ते कमिशनर कचेरीकडे निघाले. कंडक्टर तिकीट मागायला येताच अँथनीबाई मोठ्याने म्हणाल्या, 'हे गृहस्थ मला अटक करून तुरुंगात नेताहेत. माझं तिकीट यांनाच विचारा.' ट्रॅममधले लोक टकामका बघू लागले. कीनेसाहेबांचा चेहरा फोटो काढण्यालायक झाला.

दऱ्याच सोपस्कारांतून गेल्यावर कमिशनर, मतदान करणाऱ्या इतर चौदा स्त्रिया, अँथनीबाई व त्यांचे वकील आणि मतदार याद्यांत नावे नोंदवून घेणारे अधिकारी एकत्र जमले. दोन्ही बाजूंनी आपापले म्हणणे मांडल्यावर कमिशनरांनी त्यांच्यावर फेडरल कोर्टात खटला दाखल केला आणि तोपर्यंत त्यांची ५०० डॉलर्सच्या जामिनावर मुक्तता केली.

या प्रसंगाचे वर्णन करणारा एक वार्ताहर लिहितो, 'कायदेभंग करणाऱ्या बहु-

सेक स्त्रिया वयस्कर, विचारी आणि शांत स्वभावाच्या होत्या.'

१४ स्त्रियांनी जामीन भरला, पण सुसानने लगेच हेबियस कॉर्पसचा अर्ज दाखल केला. अल्बानीच्या फेडरल कोर्टात या अर्जाची सुनावणी झाली. न्यायमूर्तींनी अर्ज तर फेटाळून लावलाच पण जामीन ५०० डॉलर्सऐवजी १००० डॉलर्स वाढवला. अँथनीबाईंनी जामीन भरण्याचे नाकारून तुरुंगात जायची तयारी दर्शवली, पण त्यांच्या वकिलांनी त्यांना परावृत्त केले. ते म्हणाले, 'एका कुलीन स्त्रीला उगीचच तुरुंगवास मी पत्करू देणार नाही.'

मे महिन्यामध्ये रॉचेस्टर येथे खटल्याची तारीख पडली. सुनावणीपर्यंतचा एक महिना अँथनीबाईंनी रॉचेस्टर विभागाचा दौरा करून रोज एका गावी जाऊन आपली बाजू लोकांना समजावण्यास सुरुवात केली. 'मतदानाचा सर्व नागरिकांना समान अधिकार' हा व्याख्यानाचा विषय असे. व्याख्यानाच्या शेवटी 'लोकहो, तुम्हीच सांगा, मी कायदा मोडला आहे का?' असे अँथनीबाई विचारीत.

या प्रचारदौऱ्याची हकीकत कळताच सरकारी वकील गरम झाले. अशा तऱ्हेने लोकांची मने कलुषित केल्यावर निःपक्षपाती ज्यूरी निवडणे अशक्य ठरेल, असा त्यांचा आक्षेप होता. अँथनीबाईंनी उलट सवाल केला, 'अमेरिकेची राज्यघटना समजावून सांगणे म्हणजे मने कलुषित करणे काय?' पण तरीही या मुद्यावर सरकारी वकिलांनी खटला पुढे ढकलला. आता तारीख पडली १७ जून. स्थळ—कॅनडाग्वा. लगोलग सुसान व त्यांची एक मैत्रीण गेज यांनी या भागाचा झंझावाती दौरा सुरू केला. 'अमेरिकेच्या नागरिकांनो, मत देणे हा गुन्हा होऊ शकतो काय?' आणि 'न्यायासनासमोर अमेरिका-सुसान अँथनी नव्हे!' असे दोघींच्या व्याख्यानांचे विषय होते.

खटला सुरू झाला त्यावेळी न्यायालयात तुडुंब गर्दी झाली होती. सुसानच्या वकिलांनी ३ तास भाषण करून आपली बाजू अभ्यासपूर्ण आणि व्यवस्थित मांडली. 'योग्य ते सरकार अस्तित्वात येणे आणि ते सुरळीतपणे चालणे या गोष्टींचं पुरुषांच्याइतकंच स्त्रियांनाही महत्त्व असतं. कायदे पाळण्याची त्यांच्यावर पुरुषांच्याइतकीच जबाबदारी असते. वाईट कायद्यांचा त्यांना पुरुषांच्याइतकाच त्रास होतो. चांगल्या कायद्यांचा तितकाच फायदा होतो. त्यामुळं समान न्यायाच्या तत्त्वावर कायदे करणारे लोक निवडण्यामध्ये आपली निवड दर्शविण्याची परवानगी त्यांना दिली पाहिजे हे उघड आहे.'

यानंतर दोन तास सरकारी वकिलांचे भाषण झाले. ते म्हणाले, "कु. अँथनी यांनी जरी सद्हेतूने मतदान केले असले, राज्यघटनेने आपल्याला मतदानाचा अधिकार दिला आहे अशा भावनेने त्या ही गोष्ट करायला उद्युक्त झाल्या असल्या तरी त्यांचा हेतू वा भावना हा आपला विषयच नव्हे. मतदान करून त्यांनी प्रचलीत कायदा मोडला आहे, त्याबद्दल त्यांना शिक्षा होणे जरूर आहे.'

न्यायमूर्ती हंट यांनी लगेच टेबलाच्या खणातून आधीच लिहून तयार ठेवलेले निकालपत्र काढून वाचण्यास सुरुवात केली. अँथनीबाईंना आश्चर्यच वाटले. दोन्ही बाजूंची निवेदने ऐकण्यापूर्वीच न्यायधीश महाशय ज्यूरीला काय सांगायचं हे कसं ठरवू शकले ?

'जर घटनेच्या १५ व्या दुरुस्तीमध्ये...' न्यायमूर्तींनी रुक्ष आवाजात वाचन चालू ठेवले; 'लिंग हा शब्द आला असता...इ. इ.' अखेर त्यांनी ज्यूरीला सूचना दिली. सूचना कसली हुकूमच तो. 'सर्व गोष्टी ज्ञात असतानाही मिस् अँथनी यांनी स्वत: कायदा हातात घेऊन जबरदस्तीने या प्रश्नाचा निकाल स्वत:च्या मनाप्रमाणे लावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांना दोषी ठरवण्यात यावं, असं माझं ज्यूरीला सांगणं आहे.'

वकिलांनी तत्काळ आक्षेप घेतला, 'ज्यूरींना आपला निर्णय स्वतंत्रपणे घेऊ दिला पाहिजे.'

जज्जसाहेबांनी पुन्हा ज्यूरींना सांगितले, 'हा कायद्याचा आणि संपूर्णपणे कायद्याचा प्रश्न आहे आणि मी तो तसाच मानला आहे. त्यामुळे अँथनी यांना दोषी ठरवण्याचा मी ज्यूरींना आदेश देतो.'

वकिलांनी पुन्हा आक्षेप घेतला. जज्जसाहेबांनी उत्तर न देता लेखनिकाला सूचना दिली. लेखनिक उठून म्हणाला, 'ज्यूरीतील सभ्य गृहस्थहो, न्यायाधीश महाशयांनी सूचना दिल्याप्रमाणे आपला निर्णय द्या. अँथनीबाईंच्यावर केलेल्या आरोपाबाबत त्या दोषी असल्याचे आम्हा सर्वांचे मत आहे असे तुम्ही जाहीर करावे.'

वकील पुन्हा उभे राहिले. 'प्रत्येक ज्यूरी सदस्याचे मत स्वतंत्रपणे विचारण्यात यावे.' जज्जसाहेबांनी ज्यूरीकडे पाहिले. त्यातील एकाही माणसाने एक अक्षरही उच्चारले नाही. "ज्यूरीतील सभ्य गृहस्थहो, तुमचे काम झाले आहे. तुम्ही जाऊ शकता.' जज्ज म्हणाले.

दुसऱ्या दिवशी अँथनींच्या वकिलांनी खटला पुन्हा चालविण्याची मागणी केली. ज्यूरींच्यातर्फे न्यायदान मिळण्याचा त्यांचा हक्क अमान्य झाल्याची त्यांची तक्रार होती ही मागणी जज्जसाहेबांनी फेटाळून लावली. "आरोपीला आपल्या बचावाखातर काही सांगावयाचे आहे काय ?' त्यांनी विचारले. अँथनी उभ्या राहून म्हणाल्या, 'होय महाराज, मला बरंच काही सांगायचं आहे. कारण तुमच्या या निकालपत्रानं तुम्ही आपल्या लोकशाही राज्यपद्धतीचं मूलभूत तत्त्वच पायदळी तुडवलेलं आहे. माझे नैसर्गिक हक्क, नागरिक हक्क, राजकीय हक्क, कायदेशीर हक्क या साऱ्यांचा तुम्ही अधिक्षेप केला आहे...'

'तुमच्या वकिलांनी जे निवेदन मांडायला आधीच ३ तास खर्चले आहेत ते परत ऐकायला कोर्टाला वेळ नाही.'

"मी कोर्टाच्या असं नजरेस आणून देऊ इच्छिते की बचावाचं भाषण करत

नसून मला शिक्षा देणे हे न्याययुक्त कसं नाही हे स्पष्ट करत आहे.

'मला मतदानाचा हक्क नाकारणं म्हणजे या शासनाची हुकूमत मान्य करण्याच्या माझ्या हक्काला नकार आहे. मी कर भरणारी नागरिक असल्यामुळे माझं प्रतिनिधित्व निवडण्याच्या माझ्या हक्काला नकार आहे. ज्यूरींकडून न्यायदान मिळण्याच्या माझ्या हक्काला नकार आहे. फार काय, माझं जीवित, वित्तस्वातंत्र्य हे अधिकार आपण नाकारत आहात...'

'आपल्याला थांबायला सांगणं कोर्टाला भाग आहे.' जज्ज ओरडले.

'माझ्या अधिकारावर आक्रमण होत असता त्याविरुद्ध निषेध व्यक्त करण्याचा माझा हा उरलासुरला हक्कही तुम्ही हिरावून घेणार काय ?'

'कोर्टाला पुन्हा स्पष्ट करणं भाग आहे, आपल्यावरील खटल्याची सुनावणी आणि शिक्षा प्रचलीत कायद्याला धरूनच करण्यात झाली आहे.'

'होय. पण हे कायदे पुरुषांनीच केलेले, पुरुषांनीच अर्थ लावलेले आणि पुरुषांनीच अंमलात आणलेले आहेत. त्यामुळं ते पुरुषांची बाजू घेणारे आणि स्त्रियांच्या विरुद्ध असणारच.'

'आपण खाली बसावं, असा कोर्टाचा हुकूम आहे. एक शब्दही आता जास्त ऐकून घेतला जाणार नाही.'

'आपल्यापुढे खटला सुनावणीला आला त्यावेळी माझी अशी कल्पना होती की अमेरिकन राज्यघटनेचा उदार दृष्टिकोणातून अर्थ लावून आपण मला न्याय द्याल. पण ती फोल ठरल्यामुळे मला दयायाचना करावीशी वाटत नाही. आपण मला वाटेल ती शिक्षा करू शकता.' अँथनीबाई खाली बसल्या. त्यांना पुन्हा उभं राहण्यास फर्मावून न्यायमूर्तींनी निकाल वाचला.

'आरोपीनं खटल्याचा खर्च आणि शंभर डॉलर्स दंड भरावा, असं मी फर्मावतो.'

'तुमच्या अन्याय्य दंडापैकी १ सेंटही मी देणार नाही. मी सर्व स्त्रियांना याही पुढे हेच शिकवीत राहीन की, अन्यायाविरुद्ध लढा ही परमेश्वराचीच आज्ञा मानली पाहिजे.'

'दंड किंवा तुरुंगवास असा पर्याय आपल्यापुढे ठेवलेलाच नाही!' तुरुंगात जाऊन अँथनींना सुप्रीम कोर्टाकडे अपील करता आले असते. पण पर्यायच नव्हता. त्यामुळे दंड न भरता काय होते ते पाहायचे त्यांनी ठरवले. मतदान करणाऱ्या इतर १४ स्त्रियांच्या विरुद्ध सरकारने काहीच कारवाई केली नाही. अँथनींनी दंड भरला नाही आणि सरकारनेही काहीच केले नाही.

पण या खटल्यामुळे या प्रश्नावर लोकमत जागृत होण्यास फार मदत झाली. अँथनींच्या अनेक विरोधकांनाही न्यायमूर्तींनी ज्यूरींच्यावर लादलेला निर्णय आवडला नाही. सर्व देशातून अँथनींना सहानुभूतीची पत्रें आणि आर्थिक मदतीची तयारी दर्शवणारी पत्रे येऊ लागली. आपल्या कामात त्यांना त्यामुळे जास्तच जोर चढला.

राज्यघटनेत दुरुस्ती केल्यानेच मतदानाचा हक्क स्त्रियांना प्राप्त होईल, हे त्यांनी ओळखले.

दरवर्षी स्त्रियांना मतदानाचा हक्क देणारी विधेयके निरनिराळ्या राज्यांपुढे येऊ लागली. त्यांतली काही मान्य झाली, बरीचशी अमान्य झाली. या सर्व विधेयकांना आणि त्यांच्या पाठीराख्यांना अँथनीबाईंचा पाठिंबा होता. पण त्यांना स्वतःला केन्द्र सरकारतर्फे सर्व राज्यांकरता हा कायदा व्हावयास हवा होता. अमेरिकन स्त्री मतदान हक्क संघटनेच्या अध्यक्षा या नात्याने दरवर्षी भरणाऱ्या परिषदेमध्ये त्या या विधेयकाची मागणी करत असत.

हळूहळू परिस्थिती पालटू लागली. अँथनीबाईंचा आता सर्वत्र गौरव होऊ लागला. टोमॅटो आणि शिव्याशापाऐवजी मानपत्रे आणि सत्कार त्यांच्या वाट्याला येऊ लागले. राजकीय पुढारी त्यांचा सल्ला घेऊ लागले. वृत्तपत्रे त्यांच्याबद्दल अग्रलेख मागू लागली. शिकागो जागतिक जत्रेतील त्यांच्या प्रत्येक व्याख्यानाला जमलेली प्रचंड गर्दी टाळ्या वाजवून आणि जल्लोष करून त्यांच्या विचारांना आपला पाठिंबा दर्शवू लागली.

विसावं शतक उजाडलं आणि स्त्रियांच्यावरची बंधनं हळूहळू शिथिल होऊ लागली. पुष्कळ मुली आता सायकलवर बसत होत्या. स्कर्ट घालत होत्या. काही तर चक्क 'ब्लूमर' पँटसुद्धा. मुलामुलींच्या एकत्र शाळा चालू झाल्या होत्या. अनेक पुरुषांच्या कॉलेजमधून मुलींना प्रवेश मिळत होता. अँथनीबाईंना सर्व कॉलेजांतून मुलींना मुक्त प्रवेश हवा होता.

आपल्या गावातील रॉचेस्टर विद्यापीठावर त्यांनी मोर्चा वळवला. बऱ्याच भवती न भवतीनंतर विद्यापीठाच्या नियामक मंडळाने दरवर्षी ठराविक मुलींना प्रवेश द्यायचं मान्य केलं. पण त्याकरता अँथनीबाईंनी एक वर्षाच्या आत ५०,००० डॉलर्सचा फंड विद्यापीठाच्या मदतीकरता जमा करायचा होता.

झाले. नेहमीच्या उत्साहाने सुसानबाई फंड गोळा करण्याच्या कामाला लागल्या. पण पुष्कळशा लोकांचा स्त्री-शिक्षणाला विरोधच होता. त्यामुळे फंड अगदी सावकाश जमत होता. अँथनीबाईंना इतर कामातही लक्ष पाहावं लागत होतं. त्यामुळे एक वर्ष केव्हाच संपून गेलं. एके दिवशी त्या परगावाहून परतल्या तो फंड समितीच्या चिटणिसांची तार. 'एकच दिवस उरला. ८००० डॉलर्स हवेत.'

बाईंना रात्रभर झोप आली नाही. सकाळ उजाडताच त्यांनी मोहीम सुरू केली. त्यांच्या एका बहिणीने आपल्या मृत्युनंतर रॉचेस्टर विद्यापीठाला देण्याकरता २००० डॉलर्स ठेवले होते. ती रक्कम त्यांनी आधीच द्यायला लावली. लगेच आणखी लोकांच्या भेटी घेण्यास सुरुवात झाली. एका मित्राने २००० डॉलर्स दिले. आणखी कोणी २००० दिले. दुपार टळू लागली. दुकाने, कचेऱ्या, बँका, कारखाने. अँथनीबाईंची पदयात्रा चालूच होती. पण व्यर्थ. आणखी एक डॉलरही जमला नाही.

अखेरशेवटी पूर्वी देणगी दिलेल्या एका गृहस्थालाच अँथनीबाईंनी गाठले. त्याला सर्व परिस्थिती सांगून त्या म्हणाल्या, ' विद्यापीठाच्या नियामक मंडळाची बैठक आता चालू झाली आहे. आपली संधी थोडक्यात जाईल.' त्या गृहस्थांनी दिलेले आश्वासन पत्र घेऊन अँथनी धावत सुटल्या त्या थेट नियामक मंडळाच्या बैठकीच्या खोलीत. ' हे घ्या ८००० डॉलर्सचे वायदे '. त्या येतील अशी कोणाला कल्पनाही नव्हती. ट्रस्टींनी सगळे वायदे काळजीपूर्वक तपासले. त्यातले हे एक आश्वासन पत्र मान्य करायला ते तयार होईनात. शेवटी अँथनीबाईंनी स्वतःची विमा पॉलिसी २०० डॉलर्सकरता युनिव्हर्सिटीकडे गहाण ठेवली आणि मुलींना रॉचेस्टरमध्ये प्रवेश मिळवून दिला.

यानंतर काही दिवसांनी त्यांचं अभिनंदन करायला आलेल्या लोकांची गर्दी जमली असतानाच त्यांना अर्धांगाचा झटका आला, त्यातून त्या उठल्याच नाहीत. परंतु अपंग अवस्थेतही रॉचेस्टर विद्यापीठाच्या आवारातून गाडीतून फिरून त्या आता स्त्रियांना येथे शिकता येईल, या विचाराने धन्य होत.

अशी ही झुंजार स्त्री वयाच्या ८६ वर्षी, १३ मार्च १९०६ रोजी, स्वर्गवासी झाली. दुर्दैवाने ती हयात असेपर्यंत तिची उत्कट इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. त्याकरता आणखी १४ वर्षे लागली आणि अखेर २६ ऑगस्ट १९२० रोजी अमेरिकन घटनेच्या १९ व्या दुरुस्तीने ' अमेरिकेतील कोणत्याही राज्यात नागरिकांचा मतदानाचा हक्क लिंगवैशिष्ट्यामुळे नाकारला जाणार नाही,' या शब्दात सुसान अँथनीचे स्वप्न पुरे झाले.

या दुरुस्तीला ' सुसान बी. अँथनी दुरुस्ती ' असे म्हणतात व हेच अँथनींचे सर्वात मोठे आणि चिरस्थायी स्मारक म्हणता येईल.



## वस्तादोंका वस्ताद

# गुरू हनुमान पहिलवान

नागपूरच्या मैदानावर माझा दुहेरी लाभ झाला होता. चांगले सामने खेळण्यासाठी मिळालेच आणि वंडरबॉय वेदप्रकाशची त्याचे वस्ताद गुरु हनुमान पहिलवानांच्या समवेत गाठ पडली.

सत्तरीच्या घरात पोचलेले शरीर, पण पांढरे केस सोडले तर त्याची इतर कोणतीच निशाणी शरीरावर दिसत नव्हती. कणा ताठ होता, दृष्टी भेदक होती. वाणीत आत्मविश्वास होता. स्वतःच्या मताबद्दल ठामपणा होता.

त्यांच्या मते कुस्ती हा भरपूर श्रमाचा आणि आपल्या वस्तादावरील अभंग निष्ठेचा पेशा आहे. पहिलवानाचा गुरु हाच त्याचा पालक. त्याच्या पद्धतीप्रमाणेच पहिलवानाने राहिले पाहिजे, वागले पाहिजे. आणि तरच तो वाढेल. कोणाशी कुस्ती लढवायची हे वस्तादच ठरवू शकेल, ते त्याने मानले पाहिजे. एका महिन्यात चारपेक्षा अधिक कुस्त्या खेळू नयेत, ह्या गावाहून त्या गावी छोटया मोठ्या जत्रेतल्या कुस्त्या करत हिंडणारा पहिलवान कदाचित नाव कमावीलही पण कसा कमावील? भारत केसरी चंदगीरामसारख्या नामवंत पहिलवानाला वीर घटोत्कचसारख्या व इतर कुठल्याही सिनेमात काम करण्याची दुर्बुद्धी सुचावी याबाबत ते अतिशय नाराज आहेत. पहिलवान हा स्वभावाने नम्र असलाच पाहिजे यावरही त्यांचा कटाक्ष आहे.

त्यांचा जन्म संपन्न घराण्यात झाला आणि दहाव्या वर्षापासून त्यांना लाल मातीची ओढ लागली. कुस्तीगीर म्हणून नावलौकिकाला येण्यासाठी मात्र त्यांना पुढे वयाच्या वीस वर्षांपर्यंत थांबावे लागले. नामवंत पहिलवान रिसालसिंह हे त्यांचे गुरु. स्वतःला कुस्तीची साधना सुरु करण्यात उशीरच झाला असे मात्र

त्यांना वाटते. तीन-चार वर्षांपासूनच जर हे शिक्षण मिळाले तर तो पुढे अधिक चांगला पहिलवान होतो असा त्यांचा अनुभव आहे. काही वर्षांपूर्वी पाकिस्तानच्या गोगाने एकाच आठवड्यात हिंदकेसरी गणपत आंदळकर आणि सादिक पंजाबीला कोल्हापूर मुक्कामी अस्मान दाखविले होते. त्याच्या यशाचे रहस्य सांगताना कोल्हापूरचे एक प्रसिद्ध वस्ताद मला म्हणाले होते, 'अहो गामा-गुंगाच्या घराण्याचे हे वंशज. पोर आईच्या उदरात असल्यापासून पोरावर कुस्तीचे संस्कार चालू होतात. आईच्या खुराकापासून पोराची पहिलवानकी चालू होते. जन्माच्या पहिल्या दिवसापासून त्याला नामवंत कुस्तीगीर करण्याचे ठरवून सारी देखभाल केली जाते. नाहीतर आपल्याकडे महमद हनीफसारख्या पहिलवानाला वयाच्या दहा-बारा वर्षापर्यंत हॉटेलात कपबशा विसळाव्या लागतात आणि मग लोकांच्या आश्रयावर त्यांची वाढ चालू होते. याची बरोबरी होणार कशी ?'

लहानपणापासून मुलाला पहिलवानकी शिकवण्याची कल्पना रम्य आणि फलदायी असली तरी चांगलीच कष्टाची आहे. स्वतःचे खाजगी आयुष्य मग राहतेच कुठे ? कुस्तीच्या आणि चेल्यांच्या उत्कर्षासाठी सारे जीवन अर्पण करणाऱ्या गुरू हनुमान-सिंग यांसारख्या एखाद्या वस्तादालाच हे शक्य आहे. त्यांच्या बिर्ला व्यायाम शाळेत आज चाळीस छोट्यामोठ्यांच्या पालनपोषणासह सर्व जबाबदारी घेऊन आखाड्याची आराधना चालू आहे. आजच नव्हे गेली सुमारे चाळीस वर्षांची ही परंपरा आहे. तांबडी माती हाच त्यांचा निवारा आणि शिष्यांचे फोटो आणि बक्षिसे हाच संसाराचा पसारा.

या बिर्ला व्यायामशाळेच्या उभारणीचा इतिहास स्फूर्तिदायी आहे. एकोणीसशे चोवीस सालात दोन टांगेवाल्या गुंडाच्या तावडीतून हनुमानसिंगांनी एका महिलेला


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

सोडवले. त्याच्याच टांग्याच्या चाबकाचा त्यांनी चांगला उपयोग केला. या धैर्याची जुगलकिशोरी बिर्लाशेटनी कदर केली आणि त्यांना ही व्यायामशाळा बांधून दिली आणि त्याचा इतर सर्व खर्चही उचलला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकणारे अनेक कुस्तीगीर या व्यायामशाळेने सतत तयार केले. सज्जनसिंह, रामधन, सुरजभान, हरपालसिंह, रंधवासिंह, अमृत, रूपचंद, वेदप्रकाश, सुरेशकुमार ही काही नावे. दिल्लीतला सर्वांत जुना आणि सर्वांत नावाजलेला असा हा आखाडा. लवकर निजे लवकर उठे हे कुस्तीच्या पेशात फार उपयोगी ठरते असे त्यांचे मत. पहाटे चार वाजता मेहनत चालू व्हावयास हवी. उन्हाळ्याच्या दिवसांत थंडाई अगर सरबत पिऊन मग व्यायामाला सुरुवात केली तर ते अधिक फलदायी. भारी वजनाची डंबेल्स किंवा जड फावड्याने आखाडा उकरणे असले व्यायाम सुरुवातीला नव्या पहिलवानाने टाळावे.

मेहनतीपेक्षा लढतीवर त्यांचा अधिक भर आहे. प्रत्यक्ष कुस्ती हीच अधिक फलदायी असे त्यांना वाटते. पहिलवानाने नेहमीच आपल्यापेक्षा भारी वजनाच्या मल्लाशी लढत द्यावी हेही त्यांना तितकेसे पटत नाही. बरोबरीच्या पहिलवानाबरोबर होणारी लढत ही अधिक कसाची होते असे त्यांचे मत आहे.

ते शाकाहाराचे पूर्ण समर्थक आहेत. त्यांच्या हाताखालचे बहुतेक सर्व पहिलवान त्यामुळे शाकाहारच घेतात. बदामाची लस्सी ही पहिलवानाला बाराही महिने अत्यंत फायदेशीर, तुपापेक्षा लोणी अधिक उपयुक्त. दुधात तूप मिसळून पिणे अगर खवा खाणे हे मात्र आहार म्हणून अहितकारक अशी त्यांची मते. रात्रीची आवश्यक तेवढी झोप नियमितपणे घेतली नाही तर साऱ्या परिश्रमावर पाणी फिरले असे त्यांना वाटते.

मातीवरच्या कुस्तीबरोबरच गादीवरची कुस्तीही त्यांना अवगत आहे. ती कुस्ती त्यांना अधिक कसाची वाटते. दोन्ही प्रकारच्या क्षेत्रांत आपल्या शिष्यांचे आणि व्यायामशाळेचे नाव सतत उज्ज्वल राहावे म्हणून ते अखंड धडपडत असतात.

याही वयात ते अजून सकाळी हजार जोर बैठका मारतात. आखाड्यात उतरून डावपेच शिकवतात. चार शेर दूध, दीड पावशेर तूप, अर्धा शेर बदाम आणि फळे व भाज्या हा त्यांचा आजचा आहार आहे.

आर्य समाज आणि त्याचे प्रवर्तक दयानंद यांच्या विचारांचा त्यांच्यावर जबरदस्त पगडा आहे. सर्व जातिधर्मांचे शिष्य एका घराप्रमाणे त्यांच्या व्यायामशाळेत वाढतात. वेदप्रकाश हा असाच अगदी बालपणापासून त्यांच्या देखरेखीखाली वाढलेला मल्ल आहे.

वेदकाळातील तपश्चर्येशी नाते सांगणाऱ्या या वस्तादाच्या चाळीस वर्षांच्या साधनेचा प्रकाश आता वेदप्रकाशच्या रूपाने साऱ्या जगभर पसरला आहे.

□ □ □

चित्रपट

# लक्ष्मण-रेषा

महाराष्ट्र शासनाचे चित्रपट-महोत्सवात तिसरे पारितोषिक मिळविलेला चित्रपट लक्ष्मण-रेषा. मुंबईचा जावई व वारणेचा वाघ या दोन्ही चित्रपटांची दखल माझ्या या सदरामध्ये मी पूर्वी घेतलीच आहेत. लक्ष्मण-रेषा या चित्रपटाचा विषय तसा बटबटीत. पूर्वी अनेकांनी हाताळलेला आणि तरीही सध्या ज्या प्रकारचे मराठी चित्रपट येतात त्यांत लक्ष्मण-रेषा पुष्कळच उजवा वाटतो.


चित्रपटाच्या नावावरूनच विषयाची कल्पना येते. जस्टिस देशपांडे एका खटल्याचा निकाल देताना घरातून पळून जाऊन विवाह केलेल्या मुलीला निर्दोष सोडून देतात. इतकेच नव्हे तर मुलीला दीर्घकाळपर्यंत घरात ठेवल्याबद्दल खटला लावणाऱ्या तिच्या पालकांनाच चार शब्द सुनावतात. जस्टिससाहेबांच्या स्वतःच्या घरातच लग्नाच्या दोन मुली असतात. पैकी कवितेची त्यांना विशेष काळजी वाटत असते आणि म्हणून ते तिच्या लग्नाच्या खटापटीत असतात. त्यातच कवितेचे प्रेमप्रकरण त्यांना समजते आणि तिचा प्रियकर आपली भेट घेण्याची हेतुपूर्वक टाळाटाळ करतो आहे हे लक्षात आल्यावर ते तातडीने आपल्या मुलीचा विवाह ठरवितात. प्रेम-वैफल्याने निराश झालेली कविता आपल्या वडिलांच्या तब्येतीकडे पाहून विवाहास मान्यता देते. मध्यंतरी अदृश्य झालेला प्रियकर उमेश ऐन विवाहाच्या

शरद गोखले

वेळी डोक्याला पट्टी व हाताला बँडेज बांधून कवितेसमोर हजर होतो. प्रेमाची भावना पुन्हा उचल घेते आणि बोहल्यावर उभी असलेली कविता उमेशबरोबर चक्क पळून जाते. आता हा उमेश कोण असावा ? आतापर्यंत तो प्रेक्षकांच्यासमोर आला आहे तो केवळ कवितेचा प्रियकर म्हणून. त्याचे अगदी वेगळे व धक्का देणारे रूप आता प्रेक्षकांसमोर येते. आपली ' प्रेयसी ' कविता हिला तो चक्क एका नायकिणीला विकून मोकळा होतो. मर्यादेची लक्ष्मण-रेषा ओलांडणाऱ्या कवितेची ससेहोलपट सुरू होते. सर्व बंधने तोडून बाहेर पडलेली कविता, तिच्या पदरी आलेले दुर्दैवी जीवन व आपल्या प्रियकराचा तिने घेतलेला भीषण सूड हा या चित्रपटाचा मुख्य विषय. वडिलांनी निवडलेला कवितेचा नियोजित पती व कवितेची बहीण यांचा विवाह लावून त्यांचे उपकथानक मूळ विषयाशी चांगले सांधून घेतले आहे.

असा हा चित्रपट. एका जुन्या विषयाची प्रामाणिकपणे मांडणी करण्यात दिग्दर्शक मनोहर देसाई यशस्वी झाले आहेत. इंदुमती पैंगणकर (कविता), रमेश देव (उमेश), राजदत्त (श्रीधर) या कलावंतांनी कामे मन लावून केली आहेत. मराठी चित्रपटसृष्टीत अनेक चरित्र–अभिनेते असताना न्यायमूर्ती देशपांडे यांच्या भूमिकेसाठी डेव्हिड यांची निवड करण्यातील प्रयोजन समजू शकत नाही. डेव्हिड यांनी भूमिका मात्र समजून घेऊन केली आहे. गूळ-व्यापाऱ्याच्या भूमिकेत जुने जाणते नट भगवान पालव मजा आणतात. संवाद बोलण्यावर मात्र त्यांचा पुरेसा ताबा नाही.

चित्रपटाची तांत्रिक बाजू समाधानकारक आहे. बाह्यचित्रणाची दृश्ये चांगली घेतली आहेत. समाधानकारक निर्मिती आणि विषयाशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न यामुळे ज्वाला आर्ट प्रॉडक्शनचा हा चित्रपट ठीक वाटतो. त्याला पारितोषिक मिळालेले आहे तेही वर सांगितलेल्या त्यांच्या वैशिष्ट्यांमुळेच असे वाटते. महाराष्ट्र शासनाने चालू वर्षीपासून पारितोषिकाची रक्कम वाढवली आहे. त्याचेही स्वागत केले पाहिजे.



# सास भी कभी बहू थी

## एक छान विनोदी कथा फुकट गेली !

' सास भी कभी बहु थी. ' नावच स्पष्ट आहे. सास्वा-सुनांच्या निरर्थक झगड्यां-मुळे कुटुंबे कशी मोडतात आणि या दोन्ही महिलावर्गांनी जमवून घेतले तर कसे आदर्श संसार होतील यासंबंधीचा महान संदेश देणारा हा चित्रपट. त्यातून मद्रासी निर्मात्याचा. या चित्रपटाचा पहिला अर्धा भाग पाहाल आणि कदाचित घरी निघून येण्याची इच्छा होईल. पण तसे करू नका. कारण पुढे काही छान प्रसंग आहेत. ते चुकविणे हिंदी चित्रपटांच्या चाहत्याला तरी शक्य नाही. ओमप्रकाश, ललिता पवार आणि शशीकला या जुन्या मंडळींनी हे प्रसंग असे काही सुरेख फुलविले आहेत की ' एक फूल चार काटे 'सारख्या चित्रपटांच्या गोड आठवणी जागृत व्हाव्यात.

पहिला निम्मा चित्रपट म्हणजे मद्रासी अकलेचा नमुना आहे. फॉर्म्युलाबरहुकूम चित्रपट बेतणे शिकविण्याचा क्लास निघाला तर ' सास भी...'चा पहिला भाग तेथे आदर्श पाठ ठरेल. सुरुवातीचे काही प्रसंग एकामागोमाग नुसते मांडले आहेत व त्यात गाणी, प्रेम आदी मालमसाला नुसता घुसडलेला आहे. 'घरघरकी कहानी' हा अलीकडेच लागून गेलेला कौटुंबिक चित्रपट. त्याची हाताळणी पूर्ण गांभीर्याने केली होती. एक आदर्श कुटुंब व त्याविरुद्ध दोन बिघडलेली कुटुंबे. मामला सरळ होता. चित्रपट नेहमीच्या पद्धतीने सरळसोट विकसत जातो. प्रेक्षकांना शेवटी तात्पर्य कळते. चित्रपट संपतो. ' सास भी...'ची सुरुवातही अशीच होते. दोन कुटुंबे, त्यांतील सास्वा-सुना वगैरे वगैरे... मध्यंतर येते, वाटते. चित्रपटात दम नाही (तसा तो नाहीच). उगाच वैताग...

पण मध्यंतरानंतर सारी सूत्रे ओमप्रकाश हाती घेतो. कजाग, खाष्ट सास्वांना आणि त्यांचेच वळण उचलू पाहणाऱ्या सुनांना धडा शिकविण्याची योजना रचतो. मग ज्या गोष्टी घडत जातात त्या गमतीशीर आहेत. एकदम चित्रपट विनोदी वळण घेतो आणि त्यातील काही हास्यकारक विनोदी सिच्युएशन्स फारच गमतीदार वाटतात. उदाहरणादाखल, शशीकला व ललिता पवार या दोघी एकमेकींचे उट्टे

काढण्यासाठी एकाच वेळी परस्परांच्या घरी येण्यास निघतात. दोघींच्या घरामध्ये मोठी खाडी असते व ती होडीने ओलांडावी लागते. ललिता पवार, पांढरे शुभ्र पातळ, क्रुद्ध मुद्रा, एक डोळा कपाळावर चढलेला. ती होडीत चढते. अशा संतप्त अवस्थेत बसणे शक्यच नसते, एक पाय होडीच्या फळकुटावर ठेवून पवित्रा घेते. एक लाँग शॉट घेतला आहे. वाटते, जणू महाभारतकालीन युद्धासाठी कोणी कौरवांचा सेनापतीच येत आहे. संगीतही वाजते ते बिगुल, तुताऱ्यांचे. पौराणिक युद्धप्रसंगाची आठवण करून देणारे. इकडून उलट शशीकला तयार असतेच. त्यांचे पुढे युद्ध अतिरेकी होते वगैरे भाग वेगळा. पण या एका प्रसंगातच फार मोठी मौज आली.

चित्रपटाची बाकी मौज आहे राजेंद्रकृष्ण यांच्या संवादात आणि ते म्हणताना या जुन्या कलावंत मंडळींनी सादर केलेल्या अदाकारीत. सार्वभौम, सर्वसम्राज्ञी ललिता पवार बोलते ती साक्षात देवाधिदेव इंद्र, ब्रह्मा, विष्णू यांना आव्हान देण्याच्या पवित्र्यात. याउलट ओमप्रकाशचे संवाद अत्यंत मार्मिक, विनोदी आहेत आणि ही दोघे परस्परांसमोर येतात तेव्हा धमाल उडते.

अतिशय छान, विनोदी चित्रपट झाला असता हा. पण ' सास भी... 'ची नाडीच गवसली नाही दिग्दर्शकाला. धड ना इकडे, धड ना तिकडे असे करीत मधुसूदन यांनी हा चित्रपट सादर केला आहे. तो तारला आहे ओमप्रकाश, ललिता पवार, शशीकला यांनी. ही मंडळी नसती तर या चित्रपटाची वाताहत झाली असती. त्यातल्या त्यात ओमप्रकाश व ललिता पवार यांनी तर फारच बहारदार कामे केली आहेत. ललिता पवार त्यांच्या मूळ भूमिकेत आल्याने त्यांची सासू फारच उठावदार झाली आहे. शशीकलानेही आपली भूमिका छानदार केली आहे. ओम-प्रकाश व शशीकला यांचे संवाद घरगड्यामार्फत होतात, त्यातही कोठे अतिरेक केला नसल्याने ते गमतीदार वाटतात. ओमप्रकाशच्या आईची (शशीकलाच्या सासूची) करुण कहाणी घालून ओमप्रकाशच्या भूमिकेला कारुण्याचा स्पर्श देण्याचा प्रयत्न केला आहे. पण तो मात्र जमलेला नाही. संजय-लीना चंदावरकर जोडीने कामे ठीकठाक केली.

एक छानदार विनोदी चित्रपटाची कथा दिग्दर्शक मधुसूदन राव यांनी फुकट घालवली याचेच वाईट वाटते.

—मुंबईकर

महाराष्ट्र राज्य सरकारने
पारितोषिक देऊन गौरविलेले

# सांगत्ये ऐका



हंसा वाडकर यांचे आत्मकथन

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# कोण हटणार ?
# गरीब की गरीबी ?

आपली गरीबी आहे तरी किती ?

जमीनवाटप, खादी-ग्रामोद्योग हे गरीबी हटवण्याचे मार्ग आहेत काय ?

बेकारांना रोजगार कसा पुरविणार ?

श्रीमंतांची श्रीमंती हटविल्याशिवाय गरिबांची गरीबी हटविणे शक्य आहे काय ?

इंदिरा सरकारच्या अपूर्व विजयानंतर या प्रश्नाला आता अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

नव-कॉंग्रेसचे अस्तित्वच या प्रश्नाच्या सोडवणुकीवर अवलंबून आहे.

यासाठी पुण्याच्या ख्यातनाम गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. वि. म. दांडेकर, ' भारतीय अर्थ विज्ञानवर्धिनी 'चे अर्थतज्ज्ञ डॉ. रथ व त्यांचे इतर सहकारी यांनी सर्वसामान्यांना, विशेषतः खेडोपाडी कार्य करणाऱ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना व समाजसेवकांना, उपयोगी पडू शकेल या दृष्टीने खास सुबोध व सुगम शैलीत तयार केलेला एक प्रदीर्घ अहवालच.

# ' गरीबी हटाव ' विशेषांक

या स्वरूपात

माणूस सादर करीत आहे.

**या अंकाची किमत एक रुपया**

मासिक आकारातील सुमारे ७० पृष्ठे

( माणूस नेहमीच्या आकारातील सुमारे १४० पृष्ठे )

जागरूक मतदार, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते यांच्या संग्रही अवश्य हवा असा, जिव्हाळ्याच्या प्रश्नावरील अत्यंत माफक किमतीतील एक विचारप्रेरक विशेषांक.

प्रसिद्धी : बुधवार, ३१ मार्च १९७१

विक्रेत्यांनी व वाचकांनी अवश्य नोंद घ्यावी.

मागणीतील फेरबदल कृपया ताबडतोब नोंदवावा.